# मिरा भाईंदर महानगरपालिका

## स्थायी समिती सभा दि. १८/१२/२००३

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा गुरूवार दिनांक १८/१२/२००३ रोजी सभा सुचना क्र. २५ दि. १२/१२/२००३ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. मॉरस रॉड्रीक्स हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

### उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मॉरस जोसेफ रॉड्रीक्स | सभापती |
| २) | श्री. मोहन मधुकर पाटील | सदस्य |
| ३) | श्री. अग्रवाल धनराज नंदलाल | सदस्य |
| ४) | श्री. आसिफ गुलाब शेख | सदस्य |
| ५) | श्री. गावंड हरेश लक्ष्मण | सदस्य |
| ६) | श्री. नितीन गोपीनाथ ठाकूर | सदस्य |
| ७) | श्री. दिनेश द. नलावडे | सदस्य |
| ८) | श्री. अशोक बळवंत पाटील | सदस्य |
| ९) | श्री. पाटील शरद केशव | सदस्य |
| १०) | श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस | सदस्य |
| ११) | श्री. म्हात्रे मिलन वसंत | सदस्य |
| १२) | श्री. पाटील अनंत रामचंद्र | सदस्य |
| १३) | श्रीम. रिटा सुभाष शहा | सदस्या |

### गैरहजर सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. चंद्रकांत सिताराम वैती | सदस्य |
| २) | श्री. जोजफ जॉन घोन्सालवीस | सदस्य |

### रजेचा अर्ज आलेले सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. याकुब इस्माईल कुरेश | सदस्य |

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग, आपणा सर्वा चे स्वागत करून आजच्या सभेच्या कामकाजाला प्र. सचिवांनी सुरूवात करावी.

(प्र. सचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले)

(प्र. सचिवांनी प्रकरण १७९ चे वाचन केले)

**रिटा शाह :-**

सचिव साहेब मागच्या सभेत जी मी सुधारणा आपल्याला सांगितली होती ती केली का? व त्याची कॉपी केंव्हा मिळणार ?

**प्र. सचिव :-**

आजच्या सभेनंतर सुधारित कॉपी देण्यात येईल.

**मिलन म्हात्रे :-**

पान नं ६ मध्ये माझ्या संभाषणामध्ये १/६/२००३ ला लागते आणि शिवमुर्ती नाईक साहेब बोलतात की मला माहिती नाही. १६/०६/२००३ ऐवजी शिस्तिचा ठराव दिला व तो ६/११/२००३ ला

पास झाला आणि ६/११/२००३ ते २४/११/२००३ एवढे दिवस का लागले असे पाहिजे व त्याच्याच पुढे वय नंबर झाले आहे तिथे वर नंबर असे पाहिजे व पान नं. २२ मध्ये ठराव क्र. १६१ मध्ये दुरुस्ती सुचविली होती त्याचे काय झाले ?

**एस. एस. पाणपट्टे (मा. उपआयुक्त सो.)**

दुरुस्ती सुचविल्याप्रमाणे करण्यात आली आहे.

**रिटा शाह :-**

सचिव साहेब आपल्याला एक विनंती आहे आपण मागच्या सभेमध्ये जी काही सुधारणा आपल्याला सांगितली आहे ती सुधारित प्रत आपण आम्हाला पुढच्या सभेत दया.

**आसिफ शेख :-**

पान नं. ३४ मध्ये आपण जी समिती नेमलेली आहे विषयपत्रिकेवर विषय नसताना ती कशा पद्धतीने नेमली व आपण जी कमिटी स्थापन केली त्याला वैधानिक काही आधार आहे का ते सांगण्यात यावे.

**रिटा शाह :-**

साहेब उत्तर देण्याच्या अगोदर हयाबददलचे मी पत्र टाकले होते की सदर समिती कायदेशीर आहे का? आणि विषयपत्रिकेवर विषय नसताना आपण अशी समिती आणू शकतो का? त्याचे उत्तर मला सचिव साहेबांनी दिलेले आहे. अधिनियम १९४९ प्रकरण (२) नियम २४ चे २ अन्वये ठिक आहे. आपण मला मोघम उत्तर दिले आहे. आपण मला कायदा दाखवता की, ह्या कायद्याच्या अंतर्गत आपण समिती नेमू शकता ते मान्य करते. पण विषयपत्रिकेवर विषय असायला पाहिजे की, नाही पाहिजे ते आपण नमुद केलेले नाही, त्याचे उत्तर दिलेले नाही.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सभापती या विषयावर मागच्या वेळेला चर्चा झाली की, समिती नेमायचा अधिकार स्थायी समितीला आहेत. आणि मागच्या वेळेला अशी समिती नेमण्यात आली होती असे सन्मा. सदस्य मिलन म्हात्रेजींनी या ठिकाणी केले होते. समिती नेमायचे अधिकार स्थायी समितीला आहे. परंतु जर त्या संदर्भामध्ये विषयपटलावर विषय असेल समजा आरोग्याचा विषय विषयपटलावर असेल किंवा बांधकामाचा विषय विषयपटलावर असेल, पाणीपुरवठयाचा विषय विषयपटलावर असेल आणि नैसर्गिक बाब आहे, आपत्तीची बाब किंवा असा कोणताही विषय विषयपटलावर नव्हता आणि तो विषयपटलावर संबंधित विषय असेल तर संबंधित विषयाला जरुर ती समिती नेमली पाहिजे आणि ती समिती नेमण्याचा अधिकार स्थायी समितीला आहेत. पण जर पाणीपुरवठ्याचा विषय चालू असेल आणि आपण तिथे आर.ओ.बी. ची समिती नेमतोय तर तो विषय होऊ शकत नाही. त्यावेळी कोणता विषय होता. प्रोसिडिंगमध्ये बोलताना आपण समिती नेमायची असेल तर प्रत्येक वेळेला आपण असे विषय समिती नेमू शकतो. प्रशासनाला विनंती करतो याबाबत आपण माहिती दयावी.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

मा. सभापती साहेब, समिती नेमता येते हे कायदयाने नेमण्याचा अधिकार स्थायी समितीला आहे असे आम्ही सांगितले होते. मात्र त्यावेळेला जी चर्चा झाली त्यावेळेला समिती नेमायला कुणाचाही विरोध नव्हता. त्यामुळे सर्व सदस्यांनी मिळून समितीचे गठन करा असे सांगितले होते. पहिल्या सभेत गठन करा सांगितले आणि दुसऱ्या सभेत नेमता येते का? अजेन्डावर विषय आहे का? समिती ज्यावेळेला स्थापन केली गेली, ती सर्वानुमते केली गेली. त्यावेळेला जर तुम्ही अजेन्डावर विषय आणून मग हा विषय चर्चेला घ्या असे कोणी म्हटलेले नाही. त्यावेळेला सर्वानुमते असे ठरले की, समिती नेमा आणि त्यावेळेला चर्चा ही अशी झाली की, तुमच्या तुमच्यात अशी चर्चा झाली की, प्रत्येक पार्टीचे किती घ्यायचे. त्यानंतर समिती नेमल्यावर कायदेशीर बाबी हुडकायचे. पहिल्या सभेमध्ये अजेन्डावर विषय नाही आता चर्चा करायला नको असे कोणीही म्हटले नाही. समिती नेमता येते एवढे आम्ही उत्तर दिले असते त्यावेळेला जर तुम्ही बोलला असता की अजेन्डावर विषय आहे का? तर अजेन्डावर विषय नाही, असे आम्ही उत्तर दिले असते. त्यावेळेला समिती नेमताना एकही सदस्याने त्या समितीवर नेमू नका. विषयपत्रिकेवर विषय आणा आणि नंतर चर्चा करा, असे कोणीही म्हटलेले नाही. त्यामुळे समिती नेमली त्यावेळेला प्रश्न विचारला असता तर आम्ही सांगितले असते की, विषयपटलावर विषय नाही पुढच्या वेळेला सभापती साहेब जो निर्णय देतील त्याप्रमाणे अजेन्डावर विषय आणून मग समिती स्थापन करण्याचे ठरेल. परंतु समिती नेमू नका. ही तिसरी सभा आहे व तिसऱ्या सभेच्या वेळेला अजेन्डावर विषय आणून समिती स्थापन केली का? आणि त्यावेळेला सर्वानुमते समिती नेमणूकीचा विषय झालेला आहे. आपण निर्णय घ्यावा अशी विनंती .

**आसिफ शेख :-**

सभापती साहेब समिती नेमायची गरज का भासते? आपण समिती का नेमतो? तर काम जलदगतीने, कार्यक्षम पध्दतीने व्हायला पाहिजे. त्याकरिता आपण समिती नेमतो की, व्यवस्थित कारभार चालला पाहिजे आणि मला वाटते की, या ठिकाणी कारभार व्यवस्थित चालला आहे. आयुक्त साहेब सक्षम आहेत, उपआयुक्त साहेब सक्षम आहेत, मा. महापौर मॅडम सक्षम आहेत, मा. उपमहापौर साहेब सक्षम आहेत, सन्मा. सभापती सक्षम आहेत. तर समिती स्थापन करण्याची गरज का भासली? विषय नसताना मध्येच विषय आला चर्चा वेगळी केली, त्याला कायदेशीर आधार आहे का? दुसरी गोष्ट म्हणजे समिती स्थापन करायची आहे तर मुंबई महानगरपालिका प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम ३० अन्वये स्पष्ट तरतूद आहे की, उपसमित्या, समित्या आपण स्थापन करु शकतो. त्याचा आधार न घेता आपण परस्पर चर्चेमधून समिती स्थापन करणे कितपत योग्य आहे आणि उपआयुक्त नाईक साहेबांनी ह्या ठिकाणी जो खुलासा केलेला आहे की, कोणीही विरोध केलेला नाही तुमच्या तुमच्या मध्येच झाले आहे. आमचे काही घेणंदेणं नाही.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

काही घेणंदेणं नाही असे मी बोललेलो नाही.

**आसिफ शेख :-**

घेणंदेणं नाही याचा अर्थ आम्ही अलिप्त राहिलो, तुम्ही कोणी विरोध केला नाही असे. प्रशासनाला अंग काढून जमणार नाही. उद्या जर आम्ही सर्व सभासदांनी सर्वानुमते ठरवले सुसंवाद साधून चांगला निर्णय घेतला की, महापालिका विकायची आहे. तर प्रशासन त्यावर गप्प बसणार का? उद्या जर असा ठराव आला तर काय करणार?

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

आम्ही त्याला विरोध दर्शविणार.

**आसिफ शेख :-**

कायदेशीर काम बघण्याचे काम कोणाचे आहे, प्रशासनाचे आहे. मा. आयुक्त साहेबांनी आपल्याला अधिकार वर्ग दिला आहे एखादा विषय चर्चेत आल्यानंतर ते योग्य आहे किंवा नाही त्याला व्यवस्थित तरतुद आहे का नाही, नियमात बसते का नाही हे सर्व बघण्याचे काम कुणाचे आहे? सदस्य सगळे शिक्षित आहेत किंवा सगळयात जास्त जाणकार आहेत, सगळयात जास्त अनुभवी आहेत ह्याच्यातला काही प्रकार नाही. बाकी प्रशासनाचे काम आहे ना, बघायचे प्रशासनाने. सन्मा. सभापती साहेबांना सूचना केल्या पाहिजे. आम्ही सभापती साहेबांकडून चांगल्या अपेक्षा केल्या आहे की, त्यांच्या कारकिर्दित चांगले निर्णय झाले पाहिजे. सर्वांना विश्वासात घेउन काम झाले पाहिजे. शहराचा चांगला विकास झाला पाहिजे. असे असताना सभापती साहेबांना मिस गाईड करून मग सभापती अशानी अडचणीत येतील व प्रशासन अडचणीत आले व सर्व सदस्य जर अडचणीत आले तर ?

**मा. सभापती :-**

आपण जर त्यावेळेला सांगितले की आता काय असे करता येत नाही. आपण पुढच्या सभेत विषय घेऊ या, तर तसा निर्णय झाला असता. पण त्यावेळी सर्वांच्या मते समिती स्थापन झाली. त्यात कोणाचाही विरोध झाला नाही आणि ती समिती मान्य झाली.

**रिटा शहा :-**

जेहा ही समिती गठन करीत होते तेव्हा मला खरोखर माहिती नव्हते की, ते बोलायला मला लाज वाटत नाही की, अशा पध्दतीने कमिटी बनते किंवा नाही. तेंव्हा सभापती साहेबांनी काय रुलिंग दिले होती ते मला आठवण आहे. ते बोलले होते की, स्थायी समितीच्या सर्व सदस्यांना ह्या समितीमध्ये घ्या. याचा अर्थ स्थायी समिती फायनल झाली. त्याच्यामध्ये परत त्यांना कोणी ॲडव्हाइज केले की, एक एक सदस्य घ्यायला पाहिजे आणि तुम्ही ते सदस्य घेतले त्याबाबत देखील माझा विरोध नाही. पण जेव्हा दुसरे काही असेल तर प्रशासन आम्हाला नक्की सांगते. हे तुम्ही चुकीचे करत आहात. हे बेकायदेशीर आहे. ते कायद्यात बसत नाही. मग ह्यावेळी प्रशासनाने किमान हे बोलायला पाहिजे होते की, आपण ही जी कमिटी गठीत करत आहात, ते तुम्ही कायदेशीररित्या विषयपत्रिकेवर आणून घडवा. कमिटी घडवायचा विरोध नाही. पण चांगल्या कामासाठी आपण ही समिती घडवली आहे. काशीमिरा रोड आणि आर.ओ.बी.चा जो उडडाणपूल आहे त्याच्याबद्दल काम रेंगाळत किती वर्ष झाले? सभापती साहेबांनी जो निर्णय घेतला व त्यात जो इंटरेस्ट घेतला त्याबददल त्यांना मी धन्यवाद ही देते. परंतु ज्यावेळी ही समिती गठित केली त्यावेळी माझा विरोध होताट हे आपण प्रोसिडिंगमध्ये बघा. तुम्ही किती पक्षाचे किती सदस्य घेऊ शकता. बाहेरचे सदस्य घेऊ शकता की, नाही ह्या माझ्या

प्रश्नाचे उत्तर तुम्ही मला दिलेले नाही. साहेब त्यावेळी मी बोलली आहे तुम्ही इतिवृत्तांतामध्ये वाचा की पक्षाचे एक सदस्य घेउ शकता का? स्थायी समितीचे सदस्य घेउ शकता का? बाहेरचे सदस्य घेउ शकता का? असे मी विचारले आहे.त्याचा अर्थ मला आपण त्या प्रश्नाचे उत्तर दयायला पाहिजे होते पण आपण उत्तर दिले नाही हयाच्यामध्ये ज्याच्या मनात आले त्याने त्याचे नाव दिले. व जर आपण पक्षाच्या संमतीने घेतले तर पक्षाचे पत्र आहे का? की आमच्या कडून हा सदस्य कायम करा.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

चर्चा जी सुरु झाली ती रस्त्याच्या कामाच्या दिरंगाई साठी आणि त्यावरुन ती चर्चा ओव्हर ब्रीजवर आली आणि ओव्हरब्रीज आणि रस्ता यासाठी कमिटी स्थापन करण्यात आली.

**मोहन पाटील :-**

चर्चेमध्ये विषय आल्यानंतर कमिटी स्थापन करता येते का?

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

त्यावेळेला कमिटी स्थापन करता येत नाही असे एकही सदस्य बोलला नाही.

**मोहन पाटील :-**

कमिटी स्थापन करण्याचा विषय आहे. आणि स्थायी समितीला कमिटी स्थापन करता येते. स्थायी समितीला पॉवर्स आहेत असे मी बोललो. मागच्या वेळेला जेव्हा आरोग्याचा विषय होता विषयपटलावर, नैसर्गिक आपत्ती होती आणि पर्जन्यवृष्टी जास्त होईल, पाउस जास्त होईल व गटार साफ होऊ शकतात की नाही होऊ शकत, असा संबंधित विषय होता. त्याकरिता समिती नेमली आणि त्या समितीद्वारे अधिक गतीने काम करता येईल हा विषय झाला. समिती नेमायचे अधिकार १९४९ मध्ये दिलेले आहेत. प्रशासनाला आम्हाला असे सांगायचे आहे की, प्रशासनामध्ये एखादा विषय चर्चेला आला की, सन्मा. सदस्य हरेश गावंडजी बोलले, शाळा बरोबर नाही असे बोललो त्यावेळेला त्यांनी विषय काढला की, ह्या शाळेची समिती नेमला पाहिजे असे विषय चालू शकते का? समिती नेमली त्याबददल वाद नाही आहे पण आपला कोणता विषय चालू आहे आणि आपण कोणत्या विषयाला समिती नेमायची. अग्निशामकला काय प्रॉब्लेम झाला आहे आणि विषय बांधकाम समितीचा चालला आहे आणि सांगितले अग्निशमन दलाची कमिटी नेमा.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

सभासदांनी सविस्तर चर्चा केली आहे.

**मोहन पाटील :-**

आम्ही प्रशासनाला तेच विचारतो.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

आरोग्याचे टेंडर मंजूर झाल्यानंतर सहा महिन्यानी कमिटी स्थापन झाली काम चोख होत नव्हते म्हणून त्यावेळेही अजेन्डावर विषय नव्हता.

**मोहन पाटील :-**

साहेब तेच सांगतोय तुम्हाला की, चर्चेमध्ये समिती स्थापन करुन घेणे. ही समिती स्थापली त्याबद्दल काही नाही आणि हा विषय होता त्यावेळी त्या विषयावर मी येथे नव्हतो. पण चर्चेमध्ये समित्या स्थापन करणे, हा नियम तुम्ही जो सांगताय तो चर्चेमध्ये घेउ नका.

**मिलन म्हात्रे :-**

या येथे बरोबर टॅक्टीसने विषयपत्रिकेवरील मिनीटसच्या परवानगीनूसार विषयपत्रिकेवर नसलेला विषय येथे आणण्याचा प्रकार चालू झालेला आहे. मागच्या वेळेला जो विषय विषयपत्रिकेवर नव्हता. सदस्यांच्या पत्रव्यवहाराचा त्या विषयाने अडीच तास मिटींग हॅन्डल केली गेली. गेल्या वेळेला तुम्ही हरकत घेतली विषय पास झाला नाही. कमिटी ॲक्ट झाली नाही. कमिटीने कुठलाही निर्णय घेतला नाही. कोणीही जाउन पाहणी केली नाही. आपण जसे बोललात की, ठराव रितसर विषयपत्रिकेवर घ्या. पण ती कमिटी ॲक्टच झालेली नाही. जी कार्यवाही झालेली नाही. त्याची आपण चर्चा करण्यात अर्थच काय? ही पहिली गोष्ट आणि दुसरी सभापती साहेब, आपण तो विषय विषयपत्रिकेवर घ्या. आम्ही मतदान करुन ते करुन घेउ. कशाला कुणाला पाहिजे? तुमचा निर्णय आहे तो ते तुम्ही करावे. गेल्या वेळेला जसा मोहन पाटील ह्यांना सपोर्ट केला, तसा आम्ही तुम्हाला देखील करु.

**मा. सभापती :-**

हया कमिटीला कसला विरोध आहे का?

**मिलन म्हात्रे :-**

आमचा कसलाही विरोध नाही आणि आज ह्या सभेमध्ये हयांनी मागच्या वेळेला सांगितले की, या ठरावाच्या कमिटीला आमचा विरोध आहे. त्यानुसार आपण कुठेही पाहणी करायला गेलो नाहीत. कुठलेही आदेश दिले नाही. कुठल्याही अधिकारी बरोबर नेला नाही. प्रशासनाचा एक रुपयाही त्या कमिटीवर आतापर्यंत त्या कमिटीवर खर्च झालेला नाही हे अगदी क्लीअर कट आहे. त्यामुळे जी वस्तु चालू झालेली नाही ती परत उखडून काढायची कशाला? त्यापेक्षा पुढच्या सभेत रितसर सभेमध्ये विषयपत्रिकेवर विषय घेउन या आणि त्यांना मान्य नसेल तर त्यांनी मतदान करावे. साहेब त्यांना तुम्ही आणखीन एक संधी दया.

**मोहन पाटील :-**

अगदी चांगला सल्ला देत आहात आणि असाच सल्ला आपण दिला पाहिजे. त्यावेळेला तुम्ही सभेत असताना त्यांना सूचविले नाही ही चूक झाली नाही.

**मिलन म्हात्रे :-**

आपण ही चूक केलेली आहे ती नव्याने नाही. जे मागच्या सभागृहात झाले तेच हया सभागृहात झाले कोणी फार चूक केली किंवा कोणी फार बरोबर केले असे सांगायचा कोणी आव आणू नये. आताच्याच भाषणामध्ये कोण सदस्य बोलतात की, आम्ही सभापतींची स्तुती करतोय. विकासाच्या कामाला सभापतींनी सुरुवात केली आहे. त्याबद्दल आम्हाला बरे वाटते आणि एकीकडे समितीच्या मेंबरला विरोधपण करायचा. तुम्ही ही डबल पॉलिसी खेळू नका. विषयपत्रिकेला सुरुवात करा.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

समिती स्थापन केल्यामुळे महापालिकेचे नुकसान किंवा प्रशासन कायदेशीर अडचणीत येईल हा मुददा नव्हता. फक्त ओव्हर ब्रीज लवकर व्हावे व रस्ता लवकर व्हावे याकरिता कमिटी स्थापन केली. त्यात कायदेशीर बाबी तपासायला पाहिजे असा काही महत्त्वाचा विषय नव्हता. काम लवकर करण्यासाठी पाहणी करायची होते.

**आसिफ शेख :-**

सभापती साहेब आम्ही तेच बोलतो पाहणी करण्याकरिता समितीचा आवश्यकता कुठे भासली. सभापती डायरेक्ट आपल्या अधिकारामध्ये लवाजमासह पाहणी करायला जाउ शकतात. संबंधितांना आदेश देउ शकतात. आमचे असे म्हणणे आहे, जे काय काम करायचे आहे ते नितीनियमाने करा. अधिनियमाच्या अधिन राहून करा आणि सन्मा. सदस्य मिलन म्हात्रेजी ह्यांनी चांगली सूचना केली, त्यांना धन्यवाद देतो. त्यांनी मागच्या १३/११/२००३ च्या सभेमध्ये आम्ही नव्हतो. आम्ही असतो तर सल्ला दिला असता. आता ह्यांना पश्चातबुध्दी आठवली. आता ते सांगतात की, पुन्हा विषय विषयपत्रिकेवर घ्या. तेव्हाच सांगायला पाहिजे होते.

**मिलन म्हात्रे :-**

तुमचा विरोध झाल्यानंतर.

**असिफ शेख :-**

आमचा कोणत्या गोष्टीला विरोध नाही. चांगले काम आहे तिथे सहकार्याची भूमिका आमची आहे. एक नाही दहा समित्या आपण नेमा चांगले काम करण्यासाठी पण अधिनियमा अन्वये नेमा. परंतु चर्चेमधून मार्ग काढायचा, तुम्ही म्हणता गटाराचे काम चालले आहे आणि त्यावरुन आपण फ्लाय ओव्हरवर आलात व नंतर पाण्यात गेले. ही चर्चा अशी चालू राहणारच चर्चा कुठून कुठेतरी वळते. त्याला अर्थ नाही. माझा सांगण्याचा उददेश एवढाच आहे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

सन्मा. आसिफ शेखजी आता चांगला सल्ला आपल्याला मिलनजी म्हात्रे हयांनी दिलेला आहे आणि त्याच्या अगोदर जी समिती झाली होती. त्यांच्या ओघात तुम्ही अनेक विषय निर्माण करता की प्रशासन विषय निर्माण करत नाही. आपले नगरसेवक चर्चेच्या ओघात विषय आणतात.

**मोहन पाटील :-**

साहेब, आपण असे बोलू नका. प्रशासनाच्या किती चुका ही बॉडी घेते पोटामध्ये हे आपल्याला माहिती आहे. आपण असे बोलू नका. तुम्ही जे बोलता ते आम्ही मान्य करतो. चुका तुम्ही करायच्या आणि तुम्ही माफी मागून मोकळे होता. पण आम्ही माफी मागत नाही ना. तुम्ही आम्हाला सरळ सरळ सांगता, या कायद्याने हे करता येणार नाही. ठराव रद्द, तुमचा प्रस्ताव रद्द, तुमची मंजूरी अमान्य, तुम्ही दिलेले मान्य होणार नाही असे आपण पत्र देता. लाख चुकीचे आहे ते आणि वाचतो आम्ही ते आणि बसतो.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

कारण तुमच्याकडे सहीचा पुरावा असतो तुमच्याकडे पुरावा नसतो. त्यामुळे तुम्हाला माफी मागण्याचा संबंधच येत नाही. एक्झीकेशन आम्ही करतो कारण सभासदांचा पुरावा कुठे शिल्लक राहत नाही. ते बिनपुराव्याचे असते. त्यामुळे तुम्ही माफी मागण्याचा प्रश्न येत नाही. माफी मागावी लागते आम्हाला. कारण आमचे सहीनिशी पुरावे असतात आणि वर्किंग करताना कुठे ना कुठे झाली तर चुक झाली असे म्हणता. एक्झीकेशन म्हणजे तुमचा भाग नाही. एक्झीकेशन चांगले चालले आहे ते बघायला आहात तुम्ही आणि तुमचा सहीचा कुठेही पुरावा नाही. बिन सहीचे अधिकार असल्यामुळे बोलता जास्त येते.

**मोहन पाटील :-**

साहेब आम्ही बिन पगारी पुर्ण अधिकारी तुमच्याबरोबर असतो. परंतु आम्ही अशा प्रशासनाच्या चुका या झळकवल्या नाहीत किंवा बोटं ठेवली नाहीत.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

येथेच चुका होतात असे नाही आहे. सगळीकडेच चुका होतात. काम करताना चुका होतात. पण जर का काही कामच केले नाही, तर चुका होण्याचा प्रश्नच येत नाही. या चुकांमुळे संस्थेचे काही नुकसान झाले का? महत्वाचा मुद्दा आहे. एक्झीकेशन करताना थोडे फार चुका कर्मचाऱ्यांकडून होत असते. परंतु त्यात महानगरपालिकेचे किती नुकसान झाले, हा महत्वाचा मुददा आहे. विषय काढला त्यावेळेला जो विषय समितीचा आला त्यावेळेला कुणाचाही विरोध नव्हता. आता हे तिसऱ्या सभेला सुरु झाले आहे.

**आसिफ शेख :-**

त्या सभेला आम्ही नव्हतो.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

त्या समितीपासून नुकसान किवा फायदा झालेला नाही.

**मोहन पाटील :-**

साहेब विषय नुकसान किंवा फायदयाचा विषय नाही आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

कायदेशीर किंवा बेकायदेशीर असा मुददा आहे.

**मोहन पाटील :-**

पूर्वीचे चुकीचे, बेकायदेशीर किंवा कायदेशीर हा विषय होत नाही आणि हे प्रशासनाला विचारण्याचा अधिकार नाही आहे. प्रशासन एक्झीकेशन करते. प्रशासनाने फक्त सांगायचे अमान्य किंवा मान्य

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

ठराव तुम्ही केला आहे तो आम्ही केलेला नाही.

**मोहन पाटील :-**

सन्मा. उपआयुक्त साहेब आपण विषय क्लिस्ट करता. आपल्याला प्रशासनाचा चांगला अनुभव आहे. आपल्याला ते बोलण्याचा अधिकार नाही की पूर्वीचे चुकीचे होते अमान्य होते किंवा बरोबर होते. आपली भूमिका ती नाही आहे ही राजकीय माणसाची भूमिका ती आहे, लोकप्रतिनिधीची भूमिका ती आहे, प्रशासनाची भूमिका ती नाहीच आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

माझ्या बोलण्याचा उददेश असा होता की ठराव करताना ते चुकीचे नव्हते आणि ठराव झाल्यावर चौथ्या बैठकीत ते चुकीचे झाले.

**मोहन पाटील :-**

त्या सभेला आम्ही नव्हतो म्हणून आता बोलतोय व आम्ही सूचना मांडली त्या सभेला आम्ही उपस्थित नव्हतो आणि प्रोसिडिंगला विषय आला.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

माझ्या म्हणण्याचा उद्देशच असा आहे की, ठराव करताना कायदेशीर बाबी पाहण्याची इच्छा झाली नाही आणि आता चौथ्या सभेला ती इच्छा झाली की, ही समिती कायदेशीर आहे का बेकायदेशीर आहे.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्या रिटा शाहने सांगितले की माझा विरोध होता असे ते येथे बोलले आहेत.

**मा. सभापती :-**

आता बोला की हे मंजूर करायचे आहे का नाही मंजूर करायचे आहे.

**दिनेश नलावडे :-**

पान नं ३६ वर जे लिहीले आहे हे बनवायला सन्मा. सदस्य चंद्रकांत वैतीजी ह्यांनी जो ठराव मांडलेला आहे. त्याला माझे अनुमोदन आहे आणि तो विषय येथे संपवा असे स्वतः या ठिकाणी मॅडमनी सांगितले आहे. सन्मा सभापती साहेब अर्धा तास झाला आहे. आपण ह्या विषयावर चर्चा करीत आहेत आणि हा विषय परत दोन तास काही संपणार नाही. माजी सभापती साहेब आपण आता ह्या ठिकाणी बोलला की, अधिकारी वर्ग किती चुका करतो. सभापती साहेब तुम्ही असताना आम्ही अशा प्रकारचे काही वातावरण निर्माण केले नव्हते. जेव्हा मोहन पाटील सभापती होते तेव्हा आम्ही प्रत्येक शब्दाला त्यांच्या पाठीशी राहिलो. आम्ही चुका शोधत बसलोच नव्हतो आणि केव्हाही आम्ही त्यांना अडचणीत आणले नाही आणि आज मात्र एखाद्या छोटयाशा विषयावर आपण एक तास चर्चा करतो आणि परत त्याच विषयावर चर्चा करून आपण त्याच्यातून किती साध्य करतो हे आपण सर्वांनी ओळखायला पाहिजे. सभापती साहेब या ठिकाणी मला एवढेच सांगायचे आहे की, आपण एवढी निश्चित करा की, ही कमिटी आपल्याला बरखास्त करायची आहे. नविन विषय आणायचा आहे की, मंजूरी द्यायची आहे की नाही दयायची आहे. निर्णय घेउन आपण हा विषय संपून टाका .

**मा. सभापती :-**

प्रत्येक पक्षाच्या सभासदाला विचारतो.

**मोहन पाटील :-**

साहेब तुम्ही विचारा.

**रिटा शाह :-**

रिटा शाहने हा मुद्दा उदभवला व मी हया विषयावर पत्र दिले आहे. मी असेच वेड्यासारखे विषय उचलत नाही. मागच्या सभेला मी असेही विचारले, हयाच्यामध्ये वैती आहे आणि वैतीला माझा विरोध नाही. ते आमच्या पक्षाचेच आहेत व त्यांना माझा विरोध नाही आहे. नलावडे साहेबांनी पूर्ण प्रोसिडिंग वाचले नाही वाटते. मी पुढेपण विचारले आहे की, पक्षाचा एकच माणूस की बाहेरचा माणूस असे सर्व काय मी विचारले आहे. त्यांनंतर वैतीजींचे नाव नलावडेजी ह्यांनी सुचविले व एक निष्ठावंत नगरसेवक म्हणून मी होकार दिला. त्यानंतर मी हे पत्र टाकले त्याबददल आपण विचारत नाही का आपण हे पत्र कशाला दिले? तेव्हाही सभापती साहेबांनी सांगितले होते की, कमिटी नेमताना स्थायी समितीचे सर्व सदस्य घ्या व वैती साहेबांनी स्वतःही सांगितले की, स्थायी समितीच्या सर्व सदस्यांना घ्यावे. पण तसे न करता ही कमिटी नेमली. फक्त दुःखाची गोष्ट मला एवढीच वाटते की, त्या कमिटीमध्ये मला काम करायचे होते आणि मला घेतले नाही. त्याबद्दलचे मला दुःख आहे. फक्त आमच्या पक्षाच्या लेव्हलवर वैतीजी काम करु शकतात असे नव्हते. नलावडेजी पण काम करु शकतात. नलावडेजींनी जसे वैतीजीचे नाव घेतले, तसे वैतीजी हे गटनेता आहेत. म्हणून त्या हिशोबाने त्यांनी इतर सदस्याचे नाव घ्यायला पाहिजे होते आणि ह्या कमिटीमध्ये मला काम करण्याची इच्छा आहे म्हणून मी पत्र दिले आहे.

**दिनेश नलावडे :-**

हा पक्षाचा विषय आहे.

**रिटा शाह :-**

नलावडे साहेब मी उत्तर तुमच्याकडे नाही मागितले आहे तुम्ही मला उत्तर देउ नका.

**दिनेश नलावडे :-**

आपण एकाच पक्षाचे आहोत आपण कक्षेमध्ये बसून चर्चा करू.

**रिटा शाहः-**

हयाच्यामध्ये पक्षाचे जे बोलले आहे ते नमुद झालेले आहे पक्षाची गोष्ट तुम्ही हयाच्यामध्ये टाकायला नाही पाहिजे होते नाईक साहेब मला उत्तर दया की हया कमिटीमध्ये ठराविक सदस्य घ्यायचे असे काही आहे का ?

**मा. सभापती :-**

आपणच हयाचा निर्णय घेतलेला आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

कमीत कमी तीन सदस्य व जास्तीत जास्त पाच सदस्य असावे.

**मोहन पाटील :-**

मघाशी म्हात्रे साहेबांनी सल्ला दिला ना तर आपण विषय घ्या समिती नेमण्याचा

**धनराज अग्रवाल :-**

सभापती साहेब पिछले अर्धा पाऊणा घंटे से विषय चल रहा है। तो इसका डिस्कस करना है की निर्णय लेना है।

**रिटा शाह :-**

निकाल लावायचा आहे.

**धनराज अग्रवाल :-**

सभापती बोल रहे है आपको रखनेका है या नही वो बोले तो आप वो क्यो नही बोल रहे हो की, रखनेका है या नही रखनेका है। हर एक पार्टी के सदस्य को जादा आदमी को जादा लोग कम आदमी कम लोग अगर इस हिसाब से रखनेका है तो इस तरह लो। नही रखनेका है तो वैसा भी बोलो।

**आसिफ शेख :-**

सन्मा. सभापती साहेब, सन्मा सदस्य मिलन म्हात्रे जी ने सूचना केली आहे. तर आपण रितसर विषय आणा आणि कायदेशीर समिती नेमा. चर्चेतून समिती नेमणे योग्य होणार नाही. मिलन म्हात्रेजींनी सूचना केलेली आहे. त्याला आमचे समर्थन आहे. आपण पुढच्या सभेत रितसर विषय विषयपत्रिकेवर आणा.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

सन्मा. सर्व सभासदाना माझी विनंती आहे की, एखाद्या सभेला जर आपण गैरहजर राहिलो आणि एखादा विषय मंजूर झाला तर दुसऱ्या सभेला आल्यावर ते काम बेकायदेशीर झाले असे म्हणता येणार नाही, मा. महासभा असो किंवा स्थायी समिती.

**आसिफ शेख :-**

आमची भूमिका नेहमी पारदर्शक सुर्यप्रकाशासारखी स्वच्छ आहे. आमचे चांगले काम करण्यासाठी पहिल्यापासून समर्थन आहे. आम्ही असे म्हटले की, चर्चेतून जी समिती नेमली आहे ती बेकायदेशीर आहे. त्याला वैधानिक अधिकार नाही. तर आपण त्यावेळी सभापती साहेबांना गाईडन्स करायला पाहिजे होते. तर आज ही पाळी पुन्हा आली नसती विषयपत्रिकेवर घ्यायला.

**धनराज अग्रवाल :-**

पान नं १७ ठराव नं १४६ मध्ये जे भूईभाडे आहे ते नविन वर्षापासून म्हणजे १/०४/२००४ लिहीले पाहिजे त्याची दुरुस्ती करावी.

**एस. एस. पानपट्टे (मा. उपआयुक्त सो.) :-**

दुरुस्त केले जाईल.

**आसिफ शेख :-**

प्रकरण क्र १७९ दि. १३/११/२००३ व दि. २७/११/२००३ मा. स्थायी समितीचे इतिवृत्तांत सन्मा सदस्यांनी ज्या दुरुस्त्या सूचविल्या आहेत आणि जो समितीचा विषय आहे तो पुढच्या सभेत या संदर्भात व दुरुस्तीस ही सभा हया इतिवृत्तांताला मंजूरी देत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**हरेश गावंड :-**

स्थायी समिती २७/११/०३ ला मी गैरहजर होतो. पण ठरावामध्ये सूचक दिनेश नलावडे व अनुमोदन हरेश गावंड असे लिहीले आहे. ते दुरुस्त करुन घ्यावे.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती साहेब जे गैरहजर सदस्याचे जे नाव लिहीले आहे. त्याच्यामध्ये मग तुम्ही कोणाचे नाव टाकणार आहात. प्रोसिडिंग लिहीणाऱ्यांना आपण समज दया.

**रिटा शाह :-**

हा गंभीर गुन्हा आहे. आपण असेच कुणाचे नाव टाकणार आणि आम्ही ते मान्य करणार नाही.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महासभेचे आणि स्थायी समितीचे हे जे प्रोसिडिंग आहे हे न्यायप्रविष्ट बाबीमध्ये पुरावा आहे. ह्याच्यामध्ये अशा चुका करु नका. ही जी तुमची ग्रॅमॅटिकल मिस्टेक झालेली आहे त्याच्यामुळे हा ठराव ग्राह्य धरायचा की अग्राह्य धरायचा.

**मा. सभापती :-**

हे इतिवृत्तांत पुढच्या सभेत ठेवावे.

**मिलन म्हात्रे :-**

या ठिकाणी ते अनुमोदन माझे आहे.

**प्र. सचिव :-**

अनुमोदन मिलन म्हात्रे यांचे आहे.

**मिलन म्हात्रे :-**

हरेश गावंड यांचे नाव वगळले आहे. अनुपस्थित सदस्य हरेश गावंड यांचे नाव चुकीने लिहिण्यात आले अशी दुरुस्ती करण्यात यावी

**मोहन पाटील :-**

दुरुस्तीसह असे सूचक बोलतील.

**प्रकरण क्र १७९ :-**

दिनांक १३/११/०३ व दिनांक २७/११/०३ रोजीचे मा. स्थायी समितीचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. १५९ :-**

दिनांक १३/११/०३ व दिनांक २७/११/०३ रोजीच्या मा. स्थायी समितीच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. आसिफ शेख.** **अनुमोदन :- श्री. मिलन वसंत म्हात्रे.**

**ठराव सवार्नुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १८० चे वाचन केले.)

**धनराज अग्रवाल :-**

सभापती साहेब आपण हा जो विषय आणलेला आहे तर हे जे आरक्षण दाखविले आहे ते आपल्या पझेशनमध्ये आहे का ?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

गेल्या सभेमध्ये असे ठरले होते की, जेवढ्या आरक्षणाच्या जागा विकास योजनेअंतर्गत आहेत त्या सर्व आरक्षणाच्या जागेवर आपले बोर्ड लावावे असे सभागृहाने निश्चित केले होते. त्याप्रमाणे आपण बोर्ड लावण्याच्या विषयी टेंडर मागविण्यात आले आणि टेंडर मागविण्यात आल्यानंतर ही जी कमी दराची निविदा आहे . ती स्विकारुन त्या त-हेच्या सर्व जागेवर आपण फलक लावणार आहोत. ही जागा सध्या आरक्षित आहे.

**धनराज अग्रवाल :-**

साहेब आपण एक नक्की करा. मालकाने तो फलक काढून टाकला, तर त्याच्यावर शिक्षा करायची असे आपण काही करा.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

त्याच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल.

**शरद पाटील :-**

आपण निगोशिएशन साठी त्यांना बोलावले का?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

ज्या जागा आरक्षणामध्ये आहे. त्या जागा नागरिकाला माहिती व्हायला पाहिजे की, ही जागा अमुक गार्डनसाठी आरक्षित आहे. अमुक जागा टाउन सेंटरसाठी राखीव आहे. लोकांच्या माहितीसाठी आपल्याला बोर्ड लावायचे आहे आणि हे जर बोर्ड काढले तर सन्मा. सदस्य धनराज अग्रवाल साहेबांनी विचारल्याप्रमाणे आपण त्यांच्यावर कार्यवाही करु या.

**शरद पाटील :-**

बोर्ड लावल्यानंतर ते विचारायला आल्यावर आपण त्यांना मोबदला देणार काय देणार आहात.

**अशोक पाटील:-**

आरक्षणाच्या विषयाबददल बोलतोय आपले जे मैदानाचे आरक्षण आहे त्याचा काही सर्वे करणार होता सॉल्ट डिपार्टमेंटला नोटिस पाठवून त्याची प्रक्रिया काय झाली आहे का नाही.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

आरक्षणाचे सिटी सर्वे कडे पूर्ण रक्कम भरलेली आहे. आणि त्यांना लागणारी सर्व माहिती प्रशासनाकडून त्यांना देण्यात आलेली आहे. सिटी सर्वेला आपण आवश्यक ती माहिती दिलेली आहे. अद्याप त्यांचे अधिकारी आपल्या कडे सर्वेला आलेले नाही आहे.

**अशोक पाटील :-**

मैदानाचेबाबत आहे का ?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

मैदान आणि सर्वच

**अशोक पाटील :-**

मैदानाचे तातडीने सर्वे करायला आपण कलेक्टरकडून ऑर्डर घेतलेली आहे का?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

होय ऑर्डर घेतलेली आहे.

**अशोक पाटील:-**

सर्वे झालेला आहे का ?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

सर्वे झालेला नाही. आपण जागेला पैसे भरलेले आहे.

**अशोक पाटील :-**

आपण जे अधिकारी नेमले आहेत त्यांना आपण काम करायला लावा.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

आपण त्यांच्या सोबत चर्चा करु या.

**रिटा शाह :-**

सभापती साहेब आपण सदर विषय स्थायी समिती समोर आणलेला आहे तर हा सदरचा विषय अगोदर मा. महासभेत देखील आलेला होता. नाईक साहेब तेंव्हा आयुक्त होते व हा विषय मंजूर झाला होता मला असे वाटते मग हा विषय परत आणण्याचा उद्देश काय? एकदा मा. महासभेत मंजुर झालेला विषय पुन्हा रिव्हर्स करुन स्थायी समितीला आणण्याचे कारण काय? आणि हा मुद्दा जेव्हा चर्चेला आला होता, त्यावेळी भुखंड मालकाने स्वतःहून बोर्ड लावले आहे की, सदर माझी जागा ही ह्या आरक्षणाखाली आहे. तिथेपण जाउन तुम्ही बोर्ड लावणार काय? दुसरे आरक्षणाचा विषय अशोक पाटील साहेबांनी काढले तसे आरक्षणाचे विषयात आपल्याकडे केवढी आरक्षणाची जागा आहे आणि त्या आरक्षित जागेवर बांधकाम चालु आहे. जसे आपले डी.पी. रोड असेल, मार्केट असेल, मासळी बाजार असेल किंवा कुठलेही आरक्षण असेल, तिथे बिल्डिंगचे काम चालू आहे आणि तिथे तुम्ही आरक्षणाचे बोर्ड कुठे लावणार, ती बिल्डिंग तोडणार आहे, ते बांधकाम तोडणार आहे की, त्या बांधकामाला ॲज इट इज करुन सी.सी. देणार आहात?

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

डी.पी. वर आहे की नाही हे तपासायचे काम चालू आहे आणि त्या डी.पी. वर असलेले जे स्टील्ट कव्हरर्ड केले होते ते काल तोडलेले आहे आणि डी.पी. वर आले असेल तर त्यावर कार्यवाही केली जाईल.

**रिटा शाह :-**

साहेब मी एकच विषयासाठी बोलत नाही मी तुमच्याकडे तक्रार केली आहे ती वेगळी आहे तसे माझे दहा पत्र अनधिकृत बांधकामाचे आहे व गार्डन रिझर्व्हेशनमध्येही बांधकाम झालेले आहे आणि जे गार्डन रिझर्व्हेशन बांधकाम झालेले आहे. तर महानगरपालिकेचें प्रशासन ते बिल्डिंग तोडणार आहे आणि तिथे आरक्षणाचे बोर्ड लावणार आहेत का?

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

यापूर्वीही अनेक वेळा चर्चा झालेली आहे की, आम्ही तोडायचे काम सुरू केल्यानंतर कोर्टाकडून ऑर्डर येते की, तुम्ही त्या जागेवर जाउ नका म्हणजे बांधकामाला हात लावू नका. कोर्टाची अडचण जर सोडली तर एकही बांधकाम तोडायचे आम्ही ठेवत नाही.

**रिटा शाह :-**

साहेब आपण मला कोर्टाची जी समज देता स्टे आणायची आपल्याकडे एवढे अधिकारी वर्ग आहे आणि आपण आणखीन एवढे सिटी इंजिनिअर आणले धनगावे साहेबांच्यावर अधिकारी आणले आता गार्डन रिझर्व्हेशन मध्ये बांधकाम चालू आहे एका दिवसामध्ये बांधकाम चालू होत नाही किंवा एका

दिवसामध्ये स्टे मिळत नाही त्याचा अर्थ  असा झाला की प्रशासन डोळे मिटून राहतो.कारण कॅव्हिट फायल करायला पाहिजे तुम्हाला जेव्हा वाटते गार्डन रिझरव्हेशनमध्ये काम चालू  आहे आणि आपण असे उत्तर देउन प्रशासन असे सूटू शकत नाही.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

आमची एकही नोटीस इश्यू होताना कॅव्हीट दाखल शिवाय होत नाही.

**रिटा शाह :-**

नोटीस टाकायच्या अगोदर तुम्ही कॅव्हीट दाखल करु शकता.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

कॅव्हीट दाखल करुनच नोटीस दिली जाते स्टे मिळू नये म्हणून तरीदेखील कोर्टाने स्टे दिलेला आहे आणि त्यापुढे आम्ही जाउ शकत नाही.

**रिटा शाह :-**

स्टेटको देतात की स्टे देतात.

**मोहन पाटील :-**

आपण स्टेटको का स्टे देतील.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

स्टे देतात. महापालिकेच्या अधिका-यांनी कर्मचा-यांनी ते बांधकाम तोडू नये आणि काहीमध्ये ऑफीसरने साईडवर जाउ नये असे ही आहे.

**रिटा शाह :-**

स्थायी समितीच्या सदस्याला तुम्ही त्याची कॉपी देणार का?

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

स्थायी समितीच्या कुठल्याही सदस्याने कॉपी मागितली तर आम्ही त्यांना ऑफीसमध्ये देउ.

**रिटा शहा :-**

ऑफीसमध्ये कशाला ? तुम्ही सोळा सदस्यांना कॉपी दया.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

ज्या सदस्याला आवश्यक असेल त्यांना ती कॉपी देण्यात येइल

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

असे जर असेल तर प्रत्येक कागद देत बसायचे का?

**रिटा शाह :-**

मी प्रत्येक कागदाचे बोलत नाही आपण जे बोलता त्याचा अर्थ असा झाला की कोर्टपण चुकीचे काम करत आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

कोर्टाने निर्णय दिला की भारताच्या सर्व नागरिकांना ते मान्य असते

**मोहन पाटील :-**

साहेब आपल्याला स्टे दिलेला असतो की आपण अधिका-यांनी जायचे नाही मग त्यांना काम करण्याचे कोर्टाने अलाउड केले असते का तुम्ही काम करा.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

स्टेटको मेन्टेन झाला बोथ पार्टी म्हणून आले तर त्यांनी बांधायचे नाही आणि आम्ही तोडायचे नाही आणि एक्स पार्टी झाले नगरपालिकेला बयान केले असेल तर आम्ही जायचे नाही आणि त्यांनी बांधायचे असा अर्थ घेतात.

**मोहन पाटील :-**

पण तसा अर्थ होत नाही ना.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

आम्ही आरग्युमेंट केले आहे.  वकीलांना सांगितले आहे की, ही पध्दत बंद करा.

**दिनेश नलावडे :-**

सभापती साहेब हे जर अशा पध्दतीने कोर्टाच्या न्यायाने होत असेल तर मला वाटते की, सर्व आरक्षण अशा पध्दतीने बांधकाम चालू राहणार आहे.  महानगरपालिकेचे सदस्य या नात्याने काही तरी करायला पाहिजे

**रिटा शाह :-**

असेच राहिले तर लोक कोर्टात जाणार आणि स्टे आणणार.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

असे वक्तव्य सुध्दा करता येणार नाही असे वक्तव्य कोर्ट ऑफ कन्टेम्प्ट होतो. मी आपल्याला सांगू इच्छितो की सुप्रीम कोर्टा चे आणि हायकोर्टाचे असे एक मॅटर चालू आहे त्याच्यामध्ये तीन वर्ष जाबजबाब चालू आहे. स्टे दिल्यानंतर तोडले असे खोटे केलेले आहे प्रत्यक्षात खरे नाही पण खोट केले असले तरी ती खोटी केस आम्ही मांडू शकत नाही.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

सन्मा. सभागृह घटनेच्या भारतीय संविधानानुसार न्यायप्रविष्ट प्रकरण जे आहे ते विचाराधिन असताना त्यावर चर्चा करण्याचे अधिकार सभागृहात काय विधानसभेला किंवा लोकसभेला देखील नाही आहे. म्हणून यावर चर्चा होणे अधिक उचित नाही. परंतू आपल्याला या न्याय संस्थेचा निश्चितच आदर आहे. आपणाला माहिती असेल भारतामध्ये दोन घटना घडल्या, मुंबईची प्रतिमा इमारत जिथे अठरा माळे पूर्ण झाले होते आणि या उच्च न्यायालयाने आदेश दिला की, अठरा माळयातले सहा माळे तोडून टाका आणि दिल्लीचे व्हाईट हाउस त्यामध्येसुध्दा सुप्रीमकोर्टाने निर्णय दिला की, त्याचे चार माळे तोडून टाका. बांधलेल्या इमारतीतून लोकांना काढून इमारतीचे माळे तोडण्यात आलेले आहेत. कारण की, न्यायसंस्थेच्या पुढे आपण जाउ शकत नाही आणि त्याचा आदर आपल्याला करावाच लागेल. न्यायसंस्थेचा अनादर करणे आपल्या सभागृहाला उचित असे नाही आहे. न्यायसंस्थेबाबत जे भाष्य सभागृहात झाले ते इतिवृत्तांत घेउ नये.

**मोहन पाटील :-**

साहेब आपण बरोबर बोलता. म्हणून मी आपणाला बोललो की, आपण याबाबत आम्हाला माहिती द्या.

**मा. सभापती :-**

विषयपत्रिकेच्या विषयावरच चर्चा करण्यात यावी.

**शरद पाटील :-**

विषयावरच बोलतोय जी प्रायव्हेट जागा आहे त्याला मोबदला काय देणार आहात.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

बोर्ड लावताना मोबदला देण्याचा प्रश्नच येत नाही

**शरद पाटील :-**

आपण ॲक्वायर केल्यानंतर त्यांना काय मोबदला देणार

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

मोबदला देण्याच्या बाबत पर्याय तुमच्या पुढेच येणार आहे येथे प्रायोरिटी ठरवायची आहे. मागच्या वेळेला हयाच्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

**रिटा शाहः-**

मिरा भाईंदर क्षेत्रात जेवढी आरक्षणाची भूखंड आपल्याकडे आहे. त्याच्यावर आरक्षण बोर्ड लावण्यासाठी मी मंजूरी देत आहे. ठराव पास करा.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

विषय प्रायोरीटी ठरविण्यासाठी सभागृहापुढे आणणार आहे. नगरपालिकेचे बजेट आणि नगरपालिकेला भूसंपादन करावयाची जागा याबाबत जर विचार केला, तर माझी विनंती आहे प्रत्येक वर्षी तुम्ही किती जागा घ्यायचे हे ठरवावे आणि मिरा भाईंदर महापालिका हद्दीमध्ये मला वाटत नाही की, कोण भूसंपादनाची कॉस्ट घेउन जमीन देतील. त्यामध्ये पर्याय ठेवावा अशी माझी विनंती आहे. टी.डी.आर दिले तरी चालेल. म्हणजे रक्कम खर्च होणार नाही आणि मोठ्या प्रमाणात जागा मिळतील हे जर मोठया मनाने लवकर निर्णय झाले तर डेव्हलपमेंट करायला वाव मिळेल आणि बोर्ड लावताना त्यांना कॉस्ट देण्याचा प्रश्नच येणार नाही आणि दुसरी महत्वाची बाब, तुम्ही जोपर्यत भूसंपादनाचा ठराव करणार नाही तोपर्यंत जमिन मालक आपल्याशी निगोशिएशन करायला येणार नाही. त्यामुळे डेव्हलेपमेंट काही होणार नाही. तुम्ही ठराव भूसंपादनाचा किंवा ऑबलिक करुन टी.डी.आर. चा असा ठराव जोपर्यंत होणार नाही तोपर्यंत एकही मालक आपल्याला जमिन द्यायला येणार नाही आणि हे काम तातडीने करावे लागेल. पुढच्या काळामध्ये डेव्हलपमेंट करण्यासाठी जागा शिल्लक राहणार नाही. कृपया या विषयावर प्रत्येक वर्षी किती जागा घ्यायची ह्याचा विचार करून निर्णय घेणे आपल्या अखत्यारित बाब आहे. आपण निर्णय घ्यावा अशी विनंती.

**अनंत पाटील :-**

सभापती साहेब आरक्षणाबाबत काही लोकांची खाजगी प्रॉपर्टी जाणार घेताना बोर्ड लावून घेणार आहोत. परंतु तुम्ही जाहिर नोटिस लावली असती की, हया सर्वे नंबर असे बोर्ड लावणार आहेत.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

आम्ही बोर्ड लावताना पेपरला प्रसिध्दिकरण करणार आहोत.

**मिलन म्हात्रे :-**

हा जो विषय आणला आहे. ह्याच्यामध्ये अनुक्रमांक एक मध्ये चाळीस मल्टीप्लाय सहा तर हे मेजरमेंट काय आहे? ते सेंटिमीटर आहे का फूट आहे? अठरा गेजचा जो पत्रा दिलेला आहे हा पत्रा लोक दगड मारुन फोडून टाकतात. अठरा गेजच्या पत्राऐवजी जर सोळा गेजचा पत्रा लावला तर कॉस्ट वाढेल. बोर्ड कमी होतील पण ते बोर्ड टिकतील आणि आता जे बोर्ड लागले आहेत ते लोकांनी दगडाने फोडून काढले आहेत. अठरा गेजला दगड मारला की, पत्रा फाटतो आपण सोळा गेजचा पत्रा घ्या.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

खांबित बोर्ड लावताना महापालिकेचा स्टाफ आणि पोलीस स्टेशनच्या हद्दीतील ते अधिकारी यांच्यासह बोर्ड लावल्यानंतर फोटो काढून आणायचा आहे.

**मिलन म्हात्रे :-**

रिवाईज करण्याचे अधिकार आहे, अन्यथा नगरपालिकेचे नुकसान होईल.

**आसिफ शेख :-**

सभापती साहेब आपण एकूण ३७६ नग सांगितले आहेत. एकूण आपल्या महापालिकेचे आरक्षण किती आणि त्यामध्ये शासकीय आरक्षणे किती, खाजगी जागा किती व सन्मा. सदस्या रिटा शाह ह्यांनी जो मुद्दा उपस्थित केला की, आरक्षणावर बांधकाम चालू आहे, अशी संख्या किती? आणि आपण प्रत्यक्षात किती ठिकाणी बोर्ड लावणार आहोत त्याचा सर्वे केला का? ह्याबाबत आपल्याकडे सविस्तर अशी माहिती उपलब्ध आहे का? कृपया ह्याची माहिती द्यावी.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

सन्मा. सदस्य आसिफजी यामध्ये एकूण ३७६ नग आपल्याला तयार करावयाचे आहे. त्यामधल्या महापालिकेच्या ज्या जागा आहेत त्यात मिरा भाईंदर महानगरपालिकेने विकसित करावयाच्या ३६२ जागा आहेत. इतर संस्थेने २४, शासनाने २७, विकसित करायच्या आहेत व खाजगी जागा ३१५ आहेत.

**असिफ शेख :-**

३६२ पैकी ३१५ खाजगी जागा आहे. म्हणजे बाकीच्या ज्या शिल्लक राहतील. तिथे आपण बोर्ड लावू. खाजगी जागेवर जर त्या लोकांनीच बोर्ड लावले असतील तर आपली ह्या ठिकाणी जी निविदा आली आहे. तर खर्च कमी होईल.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

त्यांनी बोर्ड लावले असेल तर.

**आसिफ शेख :-**

आणि आरक्षणाची जी बांधकामे आहेत ती पण कमी होणार आहेत. मग प्रत्यक्षात आपल्याला किती बोर्ड लावायला लागतील.त्याचा सर्वे झाला आहे का? हे टेंडर मंजूर करण्यासाठी दुमत नाही. आपण चांगले काम करतोय हयाची पुन्हा सविस्तर माहिती घेउनच सभागृहापुढे यायला पाहिजे होते.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती साहेब माझ्या वार्डमध्ये सर्वे नं ७५३ व सर्वे नं. ७६० यामध्ये जो नियोजित मोठा रस्ता आहे. भाईंदर बायपास म्हणून हा रस्ता अत्यंत गरजेचा आहे. त्याच्या रिझर्व्हेशनबद्दल तुम्हाला आरक्षित जागा आहे. विषय क्रमांक १८२ मध्ये मार्केट बांधणे अनुक्रमांक (२) मधील या मार्केटच्या आरक्षणावर आजपर्यंत बोर्ड लागलेले नाही आणि मार्केटची जी रक्कम आहे आणि जी पहिली आरक्षणाची जागा आहे, सहा सहा महिने झाले त्याच्यावर, माझी तुमच्याकडे पत्र आहेत आणि पन्नास ते साठ सोसायटीने पत्रव्यवहार केला आहे की, रिझर्व्हेशन शहराच्या सेन्टर पॉईंटला आहे व तिथे आम्हाला मार्केट हवे. तशी कायदयात तरतुद आहे की, टाउन प्लॅनिंगमध्ये कुठलाही बदल करताना लोकांच्या काही हरकती असतील त्याचा विचार करावा आणि आरक्षणात फेरबदल करताना ह्याच्यावरचा विषय सभेमध्ये आला होता. तर त्याच्यावर लोकांनी पत्रव्यवहार केलेला आहे. मागणी केली आहे. मार्केटची जागा शहरामध्ये तुम्हाला आजच्या तारखेला उपलब्ध आहे. व्हेजीटेबल मार्केट आणि फिश

मार्केट करता, सगळयांकरिता मार्केट शहराच्या सेंटर पॉईंटला उपलब्ध आहे. अशा ठिकाणी आपले बोर्ड अजून लागलेले नाहीत. ३७६ मध्ये त्या बोर्डाचा समावेश आहे का?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

होय आहे.

**मा. सभापती :-**

नाईक साहेबांनी आता सांगितले की शहरामध्ये किती जागा भूसंपादन करायचे आहे त्याप्रमाणे आपण करुया तसेच दरवर्षी किती जागा आरक्षणामध्ये घ्यायचे हे काम करुया.

**मिलन म्हात्रे :-**

हयाच्यामध्ये कसे आहे. तिथे तुमचे रिझर्व्हेशन आहे. त्यामुळे तुम्हाला तिथे बोर्ड मारले पाहिजे.

**मा. सभापती :-**

आपण बोर्ड लावण्यासाठीच मंजूरी देत आहोत. म्हणजे एका महिन्याच्या आत बोर्ड लागतीलच

**मिलन म्हात्रे :-**

नसेल तर त्याचा समावेश करुन घ्या. जो शहराचा रोड बायपास आहे. आणि ते प्रॉयोरेटीबेसवर काम करून घ्या.

**आसिफ शेख :-**

आपण रिव्हाइस एस्टीमेट करणार आहोत की नाही अठरा गेज ऐवजी सोळा गेज असे सांगितल्याप्रमाणे आपण ते करुया. प्रशासकीय बाब आहे. पण नुसते बोर्ड लावणार का बाजूला तारेचे कुंपण वगैरे टाकणार आहे?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

जागा ताब्यात आल्याशिवाय केसिंग करण्यात येणार नाही. फक्त बोर्ड लावण्यात येईल.

**रिटा शाह :-**

साहेब माझी एक सूचना आहे आपण जे आरक्षणाचे बोर्ड लावणार आहोत तर जो भूखंड प्रायव्हेट मालकीची शासनाची आहे, नगरपालिका त्याचा उल्लेख करणार का नाही. तो उल्लेख करु नका. कारण तुम्ही तिथे शासनाची जागा लिहीले तर दुसऱ्या दिवशी लोक तिथे झोपडे बांधणार

**दिनेश नलावडे :-**

सभापती साहेब माझी एक शंका आहे आपण बिल्डिंगसाठी जो प्लान मंजूर करतो. आज आपली महानगरपालिका आहे. ह्याच्या अगोदर नगरपालिका होती. मला माहिती पाहिजे, आज जी बिल्डिंगची कामे चालू आहेत आणि अगोदर जे मोठेमोठे नाले बांधले त्या बिल्डिंगची जागा भिंत गटारावर आली आणि आता जी नविन कामे चालू आहेत, त्यांच्या भिंती नाल्यावर आल्या आहेत. त्यासाठी किती जागा सोडायला पाहिजे. आम्ही त्या डिपार्टमेंटचे एवढे माहितीगार नाहीत. मी तुम्हाला विचारतो, आज महानगरपालिका झाली आहे आणि अशाच पध्दतीची कामे सगळीकडे चालू आहेत का? आज मी आमच्या तुम्हाला माझ्या प्रभागाची सर्व बिल्डिंग दाखवतो मी ए.टी.पी. कडे गेलो व आजपण दोन दोन बिल्डिंगमध्ये झगडे चालू आहेत. एवढी जागा सोडत नाही. मग हा प्लान कसा काय मंजूर होतो.

**मा. सभापती :-**

आपण हे ए.टी.पी. ला विचारु

**अशोक पाटील :-**

आपण आरक्षणाच्या जागावर बोर्ड मारणार आहोत. उड्डाण पुलाचा रस्ता जो पश्चिमेला जातो त्या रस्त्याच्या आरक्षणाखाली जमीन मालकाचा बंगला येतोय व त्याच्यापुढे झोपडपट्टी येते. परवा त्यांचा मोर्चा आला होता. या संदर्भात आपण काय कार्यवाही करणार आहेत.

**दिपक खांबित :-**

रस्त्याच्या आरक्षणावर बोर्ड लावण्याचे नाही आहे. मालकीच्या जागेवर बोर्ड लावण्याचे आहे.

**रिटा शाह :-**

साहेब मी जे गार्डन रिझर्व्हेशनबददल बोलली व साहेब उत्तर दिले की ते न्यायप्रविष्ट आहे व आपण चर्चा करु शकत नाही. पण माझा असा प्रश्न आहे गार्डन रिझरव्हेशनमध्ये जो प्लॉट आहे त्याला प्लान संक्शन आणि सी. सी. आपल्याकडून दिलेली आहे का नाही हयाचे उत्तर आपण मला देउ शकता.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

आपल्याला याबाबत लेखी उत्तर देण्यात येईल .

**प्रकरण क्र. १८० :-**

महानगरपालिका आरक्षण जागेवर निर्देशक फलक तयार करुन पेंटिंग फिटींगसह पुरवठा करून बसविणेकामी निविदास मंजूरी देणे.

**ठराव क्र. १६० :-**

दि. ०९/१२/०३ रोजी दै. नवशक्ती या वृत्तपत्रांत प्रसिद्ध केलेल्या जाहिर निविदा सुचनेनुसार महानगरपालिका आरक्षण जागेवर निर्देशक फलक तयार करुन पेंटींग, फिटींगसह पुरवठा करुन बसविणेबाबत खालील ठेकेदारांनी मुदतीत निविदा सादर केलेल्या आहेत.

| अ.क्र. | तपशिल | मे. अनायडा इंटरप्रायजेस | मे. गजानन कंस्ट्रक्शन | शर्मा नितिन |
|---|---|---|---|---|
| १. | ४० x ४० x ६ एम.एम. लोखंडी अँगल फ्रेम.<br>१८ गेज जी.आय. शिटवर पेंटींग करुन मजकुर लिहणे (एकूण ३७६ नग तयार करणे.)<br>एस्टीमेट रु. ३,१०७/- | ७% जास्त दराने | ०.५% कमी दराने | ५.४% जास्त दराने |

उपरोक्त कामांसाठी एकूण रु. १२,३८,९१०/- एवढा खर्च अपेक्षित आहे.

वरील तुलनात्मक तक्ता पाहता ''मे. गजानन कंस्ट्रक्शन'' यांचे निविदेतील दर सर्वात कमी आहे. उक्त निविदेतील सर्वात कमी दराची निविदा स्विकारुन महानगरपालिका आरक्षण जागेवर निर्देशक फलक तयार करुन पेंटींग फिटींगसह पुरवठा करुन बसविणेबाबत व त्याकामी ठेकेदाराची वेळोवेळी येणारी देयके अदा करणेंस ही सभा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ नुसार मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्रीम. रिटा शहा.** **अनुमोदन :- श्री. दिनेश नलावडे.**

**ठराव सवार्नुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण १८१ चे वाचन केले.)

**मिलन म्हात्रे :-**

हा विषय मंजूर करताना आपल्याकडे महानगरपालिकेमध्ये एक दोन महिन्यापूर्वी कर्मचाऱ्यांना बढती दिली, क्लार्कचे हेडक्लार्क झाले. त्यांना तुम्ही बढती दिली. पगार चालू झाला. पण त्याला तुम्ही अजून चार्ज दिलेला नाही. अशी रक्कम किती फुकट गेली ते सांगा.

**आसिफ शेख :-**

सभापती साहेब सन्मा. सदस्य म्हात्रे साहेब यांनी जी सूचना याठिकाणी उपस्थित केली आहे ती योग्य आहे केळकर साहेब महापालिकेच्या ब-याच कर्मचा-यांना अजून पदोन्नती दिलेली नाही. आणि काहींना दिली आहे त्यांचा पेमेन्ट अजून दिलेला नाही.

**मिलन म्हात्रे :-**

आपल्याकडे किती कर्मचारी साधे क्लार्क होते त्यांचा पगार समजा होता पाच हजार आणि आता ते हेडक्लार्क झाले समजा दहा क्लार्क हेडक्लार्क झाले त्यावेळी दहा क्लार्कला पाच हजाराप्रमाणे पन्नास हजार रुपये दयावे लागले. त्यानंतर ते हेडक्लार्क झाले त्यांना साडेसात हजार रुपये पगार झाला. अडीच हजार वाढत आहेत. म्हणजे पंचवीस हजार वाढीव रक्कम आपल्याकडून चालले आहे. पण त्या अधिकाऱ्याला तुम्ही अजून पर्यंत कोणते आदेश दिलेले नाहीत. त्यामुळे तो हेडक्लार्क होउन सुंध्दा खालच्या खुर्चीवर आज बसला आहे व पगार हेडक्लर्क चा घेतोय.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

एकच असे पद आहे की, ज्याला प्रमुख लिपीक म्हणून आपण प्रमोशन दिले आहे व त्याच्या बदलीचा आदेश विचाराधीन आहे. आयुक्त साहेब एक दोन दिवसामध्ये बदलीचा आदेश काढणार आहे आणि मुख्य लिपीक एकच पद आहे.

**मिलन म्हात्रे :-**

किती कर्मचाऱ्यांना बढती दिली. मला फिक्स आकडा पाहिजे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

वरीष्ठ लिपीक तीन पद आहेत व लिपीक पंधरा आहेत, शिपायामध्ये.

**मिलन म्हात्रे :-**

एकोणीस कर्मचाऱ्यांच्या बढतीमुळे पगार एक्सेस चालला आहे. साहेब मी जर एम.बी.बी.एस. डॉक्टर म्हणून काम करतोय तर त्या कॅटेगिरीचा पगार मला मिळतोय मी पूर्वी कंपाउंडर होतो. आता आर.एन.पी. झालो कंपाउंडरला पगार होता दोनशे पन्नास आणि आर.एन.पी. ला पगार आहे अडीच हजार. त्या दोनशे पन्नासचे अडीच हजार झाले त्या डिफरन्सचे मी तुम्हाला बोलतोय.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

बदलीचे आदेश काढण्यात आलेले आहे. आणि त्यांना पदोन्नती देउन त्याच विभागात तात्पुरते ठेवण्यात आलेले आहे. सन्मा. सदस्य आपल्याला माहित असेल की कर विभागामध्ये मोठया प्रमाणात वसुलीचे काम सुरु आहे कर विभागाकडून आम्हाला विनंती आली. जर विभागाचे सेटअप बिघडवले तर हया महिन्याच्या वसुलीमध्ये त्याचा परिणाम होणार. त्यामुळे आम्हाला साहेबांनी सांगितले ते ज्या विभागात आहेत त्याच विभागात काम करु दया काही दिवसाकरिता व मार्च एप्रिल नंतर त्यांच्या बदल्या करु व जे काही पदे आहेत जे अन्य विभागामध्ये काम करतात. कर विभागाच्या व्यतिरिक्त त्यांच्या बदल्या कराव्या.

**मिलन म्हात्रे :-**

तुमचा अर्थ असा आहे की यापुर्वी ते कर्मचारी तिथे कार्यरत असताना चांगल्याप्रकारे काम चालायचे, असा तुमचा अर्थ निघतो आणि तुम्ही आता बदली केली तर त्यांच्या कामात व्यत्यय येईल आणि ते काम थांबेल. असे आहे तर पंचवीस टक्के वसुली झाली आहे कर विभागाची त्याच्यावर झालेली नाही. आयुक्त स्वतः स्टेटमेंटमध्ये बोलले की आमच्या कर विभागाची वसुली फार वाईट परिस्थीतीची आहे.

**मा. सभापती :-**

मिलन म्हात्रे आपण मा. महासभेत बोलूया. हा प्रशासनाचा भाग आहे हा.

**मिलन म्हात्रे :-**

प्रशासनाचा भाग नाही आहे मी सांगतोय ते पूर्ण विचार करुन घ्या विषयाला अनुसरुन बोलतोय.

**मा. सभापती :-**

बदल्या करायच्या आहेत ते प्रशासन बघून घेतील.

**मिलन म्हात्रे :-**

प्रश्न तसा नाही. ज्याला तुम्ही बढती दिली आहे. त्याला बढतीचे आदेश दयायला काय जाते.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

साहेबांनी आदेश दिले आहे. लिपीक म्हणून ते ज्या विभागामध्ये होते तिथे त्याच पदावर लिपीक म्हणून काम करत आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

ते जर खालच्या पदावर काम करत असेल तर?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

असे होणार नाही.

**प्रकरण क्र. १८१ :-**

महानगरपालिका कर्मचारी श्री महारु दौलत पाटील यांचे वय क्षमापन करणेस मंजूरी मिळणेबाबत.

**ठराव क्र. १६१ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर श्री.महारु दौलत पाटील हे लिपीक पदावर काम करीत आहेत. ते नियत वयोमानाप्रमाणे दि. ३/२/२००४ रोजी निवृत्त होणार आहेत. लिपीक श्री. महारु दौलत पाटील हे दिनांक १/१२/७९ रोजी तत्कालीन ग्रामपंचायत, घोडबंदर येथे लिपीक पदावर ठोक वेतनावर कामावर लागले होते. दि. १/१२/८३ रोजी त्यांना लिपीक पदाची वेतनश्रेणीवर (नॉन एस.एस.सी.) लिपीक पदावर नोकरीत कायम करण्यात आले.

घोडबंदर ग्रामपंचायत मध्ये रुजु होताना श्री. महारु दौलत पाटील यांचे वय ३३ वर्षे होते. शासन नियमानुसार सेवा प्रवेशासाठी निर्धारित वयोमान २८ वर्षे असल्यामुळे श्री. महारु दौलत पाटील

यांचे जास्तीचे वय क्षमापित करुन घेणे आवश्यक आहे. शासन निर्णय नगरविकास विभाग, दि. १२/जुन/१९८५ अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थापना झाली असुन त्यामध्ये घोडबंदर ग्रामपंचायतीचा समावेश करणेत आला होता. त्यामुळे तत्कालीन ग्रामपंचायत कडे असलेला कर्मचारी वर्गही नगरपालिकेमध्ये समाविष्ठ करणेत आला.

श्री. महारु पाटील यांचे जास्तीचे वय क्षमापित करुन प्रस्ताव मा. सचिव, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे मंजुरी करीता पाठविणेस ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. आसिफ शेख.** **अनुमोदन :- श्री. मिलन व. म्हात्रे.**

**ठराव सवार्नुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १८२ चे वाचन केले.)

**मिलन म्हात्रे :-**

सभापती साहेब या विषयावर मी बोलू इच्छितो माझ्या वार्ड मध्ये शहरात प्रमुख जागेवर सेन्टर पॉईंटला मार्केटचे रिझर्व्हेशन आहे. एक वर्षा पूर्वी जेव्हा हा विषय निघाला होता बोर्ड लावण्याचा त्यावेळेला मी एक टाउन प्लॅनिंग त्यावेळेच्या नगराध्यक्षांना देखील सूचना केल्या होत्या व मा. महापौरांनाही केलेल्या आहेत की, आता आपण ना फेरीवाला झोन बनवतोय. परिणामी आपल्याकडे शहरामध्ये सेन्टर पॉईंटला काही चांगल्या जागा आहेत. एकर, अर्धा एकर, सव्वा एकर, दीड एकर अशा आहेत आणि शहराच्या सेंन्टर पॉईंटल उपलब्ध होतात ही तरतूद ह्यापुढे शहरामध्ये कुठेही होणार नाही. कारण जर डेव्हलपमेंट प्लान जर आपण उघडून बघितला तर अनेक आरक्षणे ही शहराच्या सेंटर पॉईंटला रिझरर्व्हेशन मध्ये हॉस्पिटल क्रिडांगण गार्डन ह्याच्याकरिता ठेवली गेली होती. ती जाणून बूजून कमी केलेली आहे व तिथे आर झोन केलेले आहे. आता ही जी दोन आरक्षणे माझ्या वॉर्डमध्ये शहरामध्ये सेन्टर पॉईंटला राहिले आहे. त्याचा पूर्ण शहराकरिता उपयोग होउ शकतो. भाईंदर पश्चिमेला आणि अजून आपल्याकडे तीन महिने बाकी आहे. ह्याच्या मध्ये जे मार्केटसाठी आमचा पैशाचा जो निधी आहे एक कोटी रुपये, त्यावेळेला मोहन पाटील साहेब होते. त्यावेळेला आम्ही ही तरतूद करायला लावली होती. त्या ठिकाणी कमीत कमी मातीचा भराव करा. त्या जागा तुमच्या ताब्यात येतील पण एका ठिकाणी तर बिल्डरने मार्केटची अर्धी जागा एफ.एस.आय. वापरुन टाकला आणि त्या ठिकाणी तुम्हाला लॅन्ड फिलींग करण्याची गरज नाही. फक्त तुम्ही तुमचे कंपाउंड टाकायचे, आतमध्ये बोर्ड मारायचा, लेव्हलींग करायचे, तुम्ही स्ट्रक्चरपण बांधू नका, ओटा बांधा व तीनचे शेड करुन दिले तर आजच्या तारखेला शहरामध्ये सगळयात कमी पैशात महत्वाच्या जागेवर महापालिकेचे व्हेजीटेबल मार्केट शहराच्या सेन्टरमध्ये दीड महिन्यात तयार होईल, अशी तुम्हाला ग्वाही देतो. पण प्रशासनाला गेल्या दीड दोन वर्षापासून त्या जागेचे काही पडलेले नाही आता तिथे बिल्डींग चालू झाले आहे व ती जागा राहिल का नाही हा धोका आहे. त्याच्या पाठीमागे मोठी जागा आहे.

**मा. सभापती :-**

मिलन म्हात्रे आपण नियोजनला बोलावून दुसऱ्या सभेत आपण हा विषय घेउ.

**मिलन म्हात्रे :-**

मी अनुक्रमांक दोनला सांगतोय, त्याला आज मंजुरी द्याल आणि हा निधी आपला दुसरीकडे जाईल. मागच्या बजेटच्या सभेमध्ये वेस्टच्या नाल्याच्या दुरुस्तीकरिता व नविनीकरता पैसे मंजूर करुन घेतले. सभापतींनी ७५ लाख रुपये मंजूर केले आणि ते पैसे सगळे मिरा रोडला गेले. त्याच्यामध्ये नोंद करुन घेतली होती, भाईंदर पश्चिम पूर्व सगळीकडचे नाले. मी असे म्हणत नाही की, माझ्याकडचेच बनवा. तीन ठिकाणची पंचवीस पंचवीस लाखाची तरतुद करुन सगळीकडचे नाले जर तुम्ही वाढवले असते. त्याच वेळेला ते झाले नाही. नैसर्गिक दृष्टया ते नाले माझ्या वार्डमधून रनअप होतात. तुमच्याकडचा जो निचरा आहे तो सगळा माझ्या वार्डमध्ये नाल्यामध्ये येतोय. तो निधी उपलब्ध असताना कुठलाही विचार न करता पूर्णच्या पूर्ण निधी तिथे घेउन गेले आणि त्या वर्ष भरामध्ये त्या नाल्याचे एक इंचही काम झालेले नाही आता आम्ही परत हीच वाट बघायची का? या विषयावर ही तरतुद वगळायला माझा विरोध आहे. ठरावामध्ये विरोध माझा दर्शवून घ्या. हे मी विषय क्रमांक २ वर बोलत आहे. मला माझ्या येथे सेन्टर पॉईंटला व्हेजीटेबल मार्केट पाहिजे.

**दिपक खांबीत :-**

साहेब अगोदर जागा ताब्यात घेउ दया.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही मग वर्षभर काय केले ? तुमच्याकडे पत्रव्यवहार आहे. माझ्याकडे अख्खी फाईल आहे हयाच्यात कोणी पळवाट काढून पळून चालणार नाही.

**मा. सभापती :-**

आता आपण या अगोदर हयाच्यावरच बोललेलो आहोत व आपल्याकडे एकही जागा भूसंपादनाची नाही आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आयुक्त साहेबांना एखादा करदाता नागरिक आयुक्त साहेबांना अर्ज करतो. त्यावर त्यांनी पुढे कार्यवाही केली पाहिजे तिथे ती जागा राहू दे तिथे कबरस्तानाचे रिझर्व्हेशन टाकले गृहखात्याचे कबरस्तानाचे जी.आर. काय आहे ते माहिती तरी आहे का? काहीही विषय आणतात आणि समितीसमोर ठेवून देतात. ते आरक्षण रिझर्व्हेशन मार्केटचे आणि त्याच्यावर कबरस्तानाचे विषय ठेवला आणि तो मंजूरीला आणला मा. महासभेपुढे व असे प्रशासन आणते. जर तुमच्याकडे जी.आर. नसेल तर मी तुम्हाला तो जी.आर. देतो. आम्ही ज्यावेळेला हरकत घेतली त्यावेळेला विषय तहकूब झाला आणि नंतर तुम्ही ते आरक्षण बदलले पण असते. परिणामी इकडच्या लोकांना व्हेजीटेबल मार्केट शहराच्या सेन्टरला गमवावे लागले असते. आम्ही तुम्हाला सुचवतोय तुमच्या फायदयाचे आहे तुमच्याकडे जागा नाही आहे आजच्या तारखेला खाजगी जागापण तुम्ही अक्वायर करु शकत नाही आणि कोणाच्या तरी आग्रहास्तव सुदामा टॉवरच्या येथे मार्केट बनवायला घेतले होते बांधकाम विभागाने त्याच्या फीडर लाईन कुठे आहेत? त्याच्या सर्व्हीस लाईन कूठे आहेत त्याला गोडाउन आहे का? ती जागा कोणाकडे आहे? माझी हरकत नोंदवून घ्या. नाल्याचा निधी तिथे डायव्हर्ट केला आहे हयाच्याकरिता निधी तिथे डायव्हर्ट करायला माझा विरोध आहे.

**मा. सभापती :-**

नगररचनाकडून आले तर आपण त्याच्यावर काम चालू करु या.

**मिलन म्हात्रे :-**

निधीचे काय ?

**मा. सभापती :-**

आता निधी वापरले नाही तर आपल्याला काहीच काम करता येणार नाही.

**मिलन म्हात्रे :-**

मागच्या वर्षी बजेटला वाट बघितली तेंव्हा तिथे ही हाच प्रकार घउला. व त्याच्यानंतर आता हे दुसरे वर्ष आहे. अशी पाच वर्षे निघून जाणार आणि त्या जागेवर अतिक्रमण होईल. उदाहरण दिले. बिल्डरने त्याचे एफ.एस.आय. पण वापरला आहे. आणि आपल्या अधिका-यांनी त्याला एफ.एस.आय. दिला आहे. सर्टीफाय कॉपीसाठी प्लानची मागणी केली. तो बिल्डर मला भेटायला आला. काय करायचे ते बोला.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

सन्मा. सदस्य म्हात्रे जी आपण सांगितल्याप्रमाणे सुदामा टॉवरचा आपण उल्लेख केला. सुदामा नगरची जागा आपल्याला त्याचवेळी बिल्डरने आपल्या ताब्यात दिली होती. त्याठिकाणी आपण पाण्याची टाकी पण बांधलेली आहे. त्याठिकाणी आता जैन मंदिराच्या आजूबाजूला तिथे मोठया प्रमाणात फेरीवाले बसतात. त्या फरीवाल्यांना त्या जागेवर रिक्त जागेवर ज्या ठिकाणी अत्यंत घाण होती. ती जागा साफ करुन त्याठिकाणी फेरीवाले बसवण्याचे प्रस्तावित केले होते. तरी त्याप्रमाणे तिथे एस्टीमेट तयार करण्यात आले होते. हा आमचा तुमच्याकडे खुलासा आहे. त्यामध्ये आम्ही गैर असे काही केले नाही आहे. ती जागा नगरपालिकेच्या ताब्यात आहे.

**मिलन म्हात्रे :-**

गैर केले म्हणून मी सांगत नाही. तो प्रस्ताव करत असताना तुमच्याकडे प्रस्तावित ज्या मार्केटच्या जागा आहेत. त्याबददल काय केले तेवढे सांगा. आणि का केले नाही. मी ते म्हणत नाही आज तुम्ही हया कॅम्पसमध्ये बाजार भरवाल का ?उदया तिथे एखादा मेजर प्रॉब्लेम आला त्याचे कन्स्ट्रक्शन चे डिझाईन मी बघितली आहे. तुम्ही मोकळया जागेची गोष्ट करता मी लांबी रुंदी बघितली आहे. म्हणून तुम्हाला बोलतोय उदया तिथे एखादा मेजर प्रॉब्लेम झाला आणि तुमचे स्ट्रक्चर असेल तर तुम्ही त्याची रिपेअरिंग करु शकाल? सगळा स्ट्रक्चर तुम्हाला तोडायला लागेल प्रश्न असा नाही आहे.

तिथे काही दुसरेपण घ्यायचे आहे. पाणी खात्याचे महत्त्वाचे बांधकाम तिथे बांधायचे आहे. माझा त्याला विरोध नाही. आहे मी काय सांगतो ते आपण पूर्णपणे ऐकून घ्या. जिकडे शहराच्या सेंटरला तुमचे मार्केट मंडई करिता जागा ठेवलेली आहे. त्याबददल तुम्ही काहीतरी प्रयत्न करा. तिथे मातीचा भराव करायला आहे. त्याबददल तुम्ही काहीतरी प्रयत्न करा. तिथे मातीचा भराव करायला तुम्हाला परमीशन लागते का? तर परमीशन घ्या जशी तुम्ही सॉल्टेड वेस्ट साठी परमिशन घेतली तसे महत्वाच्या जागेसाठी परमीशन घेता येत नाही का?

**दिपक खांबित :-**

आपण ठरवा की कुठल्या जागा ताब्यात घ्यायच्या आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही प्रॉयरीटी घ्या ना हया विषयाला अनुषंगाने बोलतोय हयाच्यावर सभापती साहेब आपण रुलिंग दया.

**दिपक खांबित :-**

आपण प्रॉयॉरिटी ठरवा.

**मिलन म्हात्रे :-**

विषयानुसार मी बोलतोय अनुक्रमांक दोन मध्ये मार्केटची जी तरतुद आहे ती वळवायला माझा विरोध आहे. हयाच्यामध्ये माझा तुम्ही प्रस्ताव घ्या.हयाच्यामध्ये भाईंदर वेस्ट मार्केटच्या ज्या रिझर्व्हेशन आहेत त्यात शहरामध्ये कुठेही जागा राहिलेली नाही. त्याठिकाणी मार्केटची ती जागा ताब्यात घेण्यासाठी जो निधी लागणार आहे, तो निधी पहिला पॉयरीटी बेसवर येथे घ्यावा. पण आज तुम्ही तिथे मार्केट उचलायला ना फेरीवाला झोन केला तर त्याची परिस्थिती काय होणार या शहराची.

**दिपक खांबीत :-**

साहेब दोन मार्केटच्या जागा आहेत. त्या ताब्यात घ्यायच्या आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

पुढे स्टेशनला हॉकर झोन आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

ताब्यात घ्यायच्या असा प्रश्न होणार नाही. जो पर्यंत स्थायी समिती किंवा मा. महासभेमध्ये भूसंपादन करा असा ठरावा पेपरला नोटिस प्रसिध्दीकरण झाले तर तडजोड करायला येती त्याना आपण आता बोलवायला गेलो तर ते जागा दयायला तयार होत नाही. आपण रिझरव्हेशन करु शिफारस करा की हे भूसंपादन तरी करा किंवा ऑबलिक करुन टी. डी. आर. दया असा तुम्ही ठराव करुन दिले तर ते जागेवर येतील .

**मिलन म्हात्रे :-**

नाईक सो. आपण ज्यावेळी आयुक्त पदावर होता. त्यावेळेचा प्रसंग आहे. माझ्या वार्डमधल्या जवळ जवळ साठ सोसायटयांचा पत्रव्यवहार तुम्हाला मिळाला होता ही जागा हयाच्यावर कबरस्तानाचे रिझरव्हेशन टाकायला बघत आहेत आणि ते तुम्ही तिथे कबरस्तान न करता व्हेजीटेबल मार्केट पाहिजे आम्ही लोकांची प्रतिक्रिया आणि मत मागणी तुमच्याकडे पोहचविली त्यानंतर साठ सत्तर सोसायटयांचे अर्ज आल्यानंतर प्रशासनाचे काय काम बनते की नाही. प्रशासनाने त्याच्यावर काय हालचाल केली पाहिजे की नाही. कलेक्टर लॅन्ड आहे. उद्यापासून तुम्ही मातीचा भराव टाकायला घ्या.

**आसिफ शेख :-**

सभापती साहेब जागा तर ताब्यात नसेल आणि आपण जर खर्च केला आणि नंतर वाद उपस्थित झाले तर काय होणार खर्च वाया जाणार आहे.

**मिलन म्हात्रे:-**

जेवढी रिझर्व्हेशन आपल्या मॅपमध्ये आहेत. त्याच्यापेक्षा पंचवीस तीस रिझर्व्हेशन त्याच्यामध्ये कमी आहे. त्या रिपोर्टमध्ये एवढा फॉल्ट आहे.

**दिपक खांबीत :-**

आपण जागा ताब्यात घेउन दया.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

प्रत्येक वेळेला स्थायी समिती आणि मा. महासभेमध्ये बोलताना सर्व खाते हे एक आहे असे समजून बोलायला पाहिजे दुसऱ्या डिपार्टमेंटला भूसंपादन करुन दया मी काम करायला तयार आहे असे बोलून चालणार नाही. तुमचे प्रशासन हे तुम्ही एकत्र बसून चर्चा करुन निर्णय घ्या. मला जागा

ताब्यात घेउन दया असा विषय होणार नाही नगररचना विभाग आणि बांधकाम विभाग आपण आयुक्त साहेब यांच्याकडे बसवून ठरवून घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

मला हयाच्यावर रुलिंग पाहिजे.

**मा. सभापतीः-**

पुढच्या वेळेला आपण हा विषय घेउ या.

**आसिफ शेख :-**

सभापती साहेब जागा जर ताब्यात नसेल आणि जर आपण खर्च केला तर तो खर्च वाया जाणार आहे. आता तीन महिने राहिले आहे. नाईक साहेबांनी सांगितले अगोदर भूसंपादन करण्याचा प्रस्ताव आणा व आरक्षित ज्या जागा आहेत त्याचा प्रस्ताव एकत्रित आणा जागा भूसंपादित करा आणि नंतर तरतूद ठेवा आणि आता ती तरतूद जर वाया जात असेल तर उपयोग नाही आणि हे जे आहे हे ॲज इट इज मंजूर होउ दया.

**मा सभापतीः-**

ठिक आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

पुढच्या सभेला आरक्षणाचे सगळे विषय प्रॅायॅरिटी ठरविण्यासाठी सभापतींनी मी आता विचारले तर सभापती साहेब बोलले की पुढच्या सभेला हा विषय ठेवतो प्रत्येक वर्षी किती जागा घ्यायच्या व किती डेव्हलपमेंट करायचे. नगरपालिकेचे उत्पन्न आणि काय डेव्हलपमेंट करायचे हयाची तडजोड करुन प्रॅायरीटी ठरवून दया.

**मोहन पाटील :-**

आता मार्केटचा विषय आहे. त्याच्यावर काय करायचे ते सांगा.

**मिलन म्हात्रे :-**

हयाच्यामध्ये तुम्हाला सर्वे चे पैसे भरायला लागणार. सर्वे अपॉइट करायला लागणार साहेब माझा फक्त आक्षेप अनुक्रमांक दोनला (अ) ला आहे. हयाची जी टोटल रक्कम तुम्ही वर्ग करणार आहात हयाच्यामध्ये ती तरतुद ठेवा.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

किती रक्कम तरतुद ठेवावी ते तुम्ही सांगा.

**मिलन म्हात्रे :-**

हयाच्यामध्ये तुम्ही तरतुद वीस लाखापर्यंत ठेवा.

**मा. सभापती :-**

वीस लाखापर्यंत तरतुद ठेवावी.

**अशोक पाटील :-**

आसिफ साहेब म्हणतात की जागा ताब्यात आल्याशिवाय आपण खर्च कसा करायचा ? तर आपण स्टेडियम एवढा डेव्हलप केला तर ती जागा आपण ताब्यात घेतली का?

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

स्टेडियमच्या जागेचा ताबा मिळालेला आहे.

**अशोक पाटील :-**

जागा कधी मिळणार? सर्वे तर चालू आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

कलेक्टरची ऑर्डर आहे. पार्टली जागा ताब्यात मिळालेली आहे.

**मोहन पाटील :-**

सभापती महोदय हया पंच्चान्नव लाखाचे वीस लाख तुम्ही वर्ग करता. त्याच्यामध्ये प्रभाग क्र. २३ मध्ये गटार आणि गटाराचे स्लॅप हे काम आपण नमुद करुन घ्या.

**आसिफ शेख :-**

नवीन गटार बांधकाम आहे. पोलिस स्टेशन ते टोल नाक्यापर्यंत. ते समाविष्ट आहे. आपल्याला कत्तलखान्याची एजन्सी नेमायची आहे. त्यासाठी देखील पैसे लागतील.

**मिलन म्हात्रे :-**

केळकर साहेब अनुक्रमांक दोनमधील एन.एन.कॉलेजच्या येथे नाल्याची पुर्न बांधणी करणे हा नाला वैदयकीय अधिका-यांबरोबर जाउन स्वतः मी समक्ष पाहिलेला आहे. हया नाल्याची मॅन्युफॅक्चरींग

डेट काय आहे? ते काम कधी पूर्ण झाले आहे? कारण ते काम आता नविन झाले आहे. त्यावेळेला ठेकेदाराने निकृष्ट दर्जाचे बनवले व ती भिंत अख्खी ढसली आहे. तो ठेकेदार कोण आहे ?त्याने ते काम चुकीचे केले आहे. ते काम किती वर्षापूर्वीचे आहे. ते काम परत हयाच्यामध्ये खर्चाचे झाले आहे.

**दिपक खांबित :-**

तो नाला १९८७ साली बांधला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

त्याच्यावर तीन वेळा एक्स्टेंनशन झाले. एक भिंत त्याच्यावर दुसरी आहे व त्याच्यावर तिसरी आहे. एस. एन. कॉलेजच्या बिल्कुल समोर तीन वेळा एक्स्टेंनशन झाले आहे आणि त्या भिंतीचे तिन्ही पार्ट सरकलेले आहेत.

**दिपक खांबित :-**

दुरुस्ती केले पण जे.सी.बी.ने तो नाला पडला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

जे.सी.बी. वगैरे काही नाही तिथे डांबरी रोड खचला आहे. सभापती साहेब माझी जी सूचना आहे ती आपण फक्त विचारात आणा. एस.एन.कॉलेजच्या समोर नाल्याचे जे बांधकाम आहे ते तयार कधी झाले व त्याची गॅरेंटी किती.

**दिनेश नलावडे :-**

इंदिरा नगरचा नाला जी भिंत कोसळली ती साफसफाई करतेवेळी जे.सी.बी. ने कोसळली आहे.

**मा. सभापती :-**

म्हात्रे साहेब, तो नाला वर्ष-दोन वर्षापुर्वी बांधला असेल तर त्या ठेकेदाराकडून पुन्हा दुरुस्त करुन घेऊ.

**धनराज अग्रवाल :-**

सभापती महोदय, जे पुर्नविनियोजन आलेले आहे. आणि आता जानेवारी येतोय आणि मार्च महिना संपणार आहे. प्रत्येक सभेला पुर्न विनीयोजन हे येणार. तुम्ही प्रत्येक वेळेला आणू शकता की एकदाच आणला पाहिजे नियमाप्रमाणे की सर्व पुर्न विनीयोजन एकत्र करून आणले पाहिजे तो विषय की एवढे एवढे काम होणार नाही आणि आपण पुर्न विनीयोजन करु. प्रत्येक वेळेला आणण्यापेक्षा सगळे विषय एकदाच आणले पाहिजे. हे जे कत्तलखाने, मार्केट, विश्रामगृह, कार्यशाळा हे सर्व आपले जरुरीचे विषय आहेत आणि हयाच्याकरिता प्रशासनाने आजपर्यंत काय केले? करत का नाही? हे मला विचारायचे आहे आणि आपल्याला लाखो रुपये मार्केटमधून येतो. पण मार्केट आपण आजपर्यंत बांधले नाही. मागचे दहा वर्ष गेले आणि आता परत पाच वर्ष जाणार.

**मोहन पाटीलः-**

सन्मा.सदस्य धनराज अग्रवालजींनी प्रश्न मांडलेला आहे. तो योग्य आहे. जेव्हा बजेट देतो. तेव्हा त्याबजेटचे हेड देतो. त्या हेडचे पूर्णपणे फॉलअप आपण ठेवला पाहिजे व काहीना काही तरी केले पाहिजे. पण वर्षभर काहीच करत नाही. प्रशासनाने त्वरित कार्यवाही करावी असे मला वाटते.

**अशोक पाटीलः-**

उपआयुक्त साहेब, सन्मा. सदस्य मोहन पाटील व धनराजजी अग्रवाल हयांनी जो प्रश्न उपस्थित केला व १९९८ साली आपला विकास आराखडा फायनल मंजूर झाला. तर १९९८ सालापासून २००३ संपत आले. आपल्या प्रशासनाने हया जागा आरक्षणाच्या ताब्यात घेण्यासाठी अजून काहीच फॉलअप केलेले नाही. आता आपण अधिकारी नेमलेले आहेत. खाजगी जागा, सरकारी जागा संपादित करण्यासाठी प्रशासन हयामध्ये गांभीर्याने लक्ष घालणार का? हया जागा संपादन करण्यासाठी.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

समितीने गांभीर्य घ्यायला पाहिजे की, टॉप प्रॉयरिटीवर भूसंपादन करावे आणि अर्जेंटशी क्लॉज लावून करावे असा ठराव करा.

**मोहन पाटीलः-**

ठरावाचा प्रश्न येत नाही. हे रुटींग काम आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

यापूर्वी सभापती साहेबांनी सभागृहाला सांगितले आहे. पुढच्या अजेन्डावर आरक्षणामधले भूसंपादनाचे विषय घेउ. तर तो विषय आल्यानंतर तुम्ही त्यावेळेला कोणकोणते संपादन करायचे ठरवले तर आठ दिवसात आम्ही भूसंपादनासाठी पाठवून देउ.

**मोहन पाटीलः-**

मग, कशाला पुर्नविनियोजन पाहिजे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

जागा ताब्यात घेण्यासाठी जेवढी रक्कम पाहिजे. तेवढी ठेवा व बाकीची वर्ग करा.

**मोहन पाटीलः-**

साहेब, हया जागेला तुम्ही प्रायरीटी ठरवा की, जे दोन मार्केट भाईंदर पूर्व व भाईंदर पश्चिमेला मार्केट बांधायचे आहेत. तर हया एक कोटीमध्ये त्या जागेची किंमत किती असेल?

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

तुमच्या मताशी सहमत आहे. परंतु, मिरा भाईंदरचे जर लोकेशन पाहिले तर मुंबईच्याजवळ असणा-या ज्या महापालिका आहेत. त्या महापालिका भूसंपादनाची रक्कम घेउन जागा ताब्यात देत नाही. कल्चर अशी आहे की, टी.डी.आर. मागतात. त्यामुळे पैसा आम्हाला लागणार नाही. पण थोडेफार पैसे ठेवावे अशी विनंती.

**मोहन पाटीलः-**

पुढच्या सभेत विषय येतोय आणि तुम्ही ते काम आठ दिवसात होत असेल व आम्हाला प्रायोरीटी बेसीसवर वाटले हे मार्केटचे काम आम्हाला सुरु करायचे आहे. तर आम्ही करु शकतो. इव्हन मार्केटचे काम नंतर सुरु केले व जागा भूसंपादनाची असेल पैशांनी, तर दोन गोष्टी आहेत. टी.डी.आर. पण आहे आणि पैसा पण आहे. प्रश्न येतच नाही.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

जागा ताब्यात घेण्याची तेवढी रक्कम ठेवा.

**मोहन पाटीलः-**

होय, असे मला बोलायचे आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

३१ मार्चपर्यंत इमारत बांधकाम होणार नाही व पुढच्या सभेत विषय ठेवण्यात येणार आहे. त्यावेळी तुम्ही प्रॉयरिटी ठरवा.

**आसिफ शेखः-**

निवडणुकीत आश्वासन दिले आहे की, आम्ही गार्डन करु, मार्केट करु, आम्ही आरोग्य सेवा उपलब्ध करुन देउ असे प्राधान्यक्रम ठरवायला पाहिजे.

**अशोक पाटीलः-**

मागच्या वेळी बजेट बनवताना आपण हे विषय घेतले होते प्रॉयरिटीवर. कत्तलखाना, मार्केट हे विषय घेतल्यामुळे तुम्ही बजेटमध्ये तरतुद केली होती व हयाला आपण प्रॉयोरिटी दिली होती.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

ट्रायल बेसीस म्हणून आम्ही मा. महासभेमध्ये शिवार गार्डनचा विषय ठेवला होता. त्यावेळेला बजेटमध्ये प्रोव्हिजन होते एक कोटीचे व बॉडी काय निर्णय करते ते बघावे व तुम्हीच म्हणता की, टॉप प्रॉयरिटी देउन भूसंपादन करा आणि एखादया बजेटमध्ये प्रोव्हिजन असलेली रक्कम दाखवून एक कोटीची तरतुद दाखवून शिवार गार्डनचा विषय आणल्यावर हेच का आणले, दुसरे का आणले नाही म्हणून तहकूब केले. आता असे ठरले व मा. महासभेतसुध्दा असे ठरले आहे की, सगळे आरक्षण तुम्ही अजेन्डावर आणा आणि प्रॉयोरिटी ठरवून घ्या. त्याप्रमाणे सभापती साहेबांनी सांगितले, तुम्ही जे प्रॉयोरिटी ठरवाल त्याप्रमाणे प्रशासन काम करेल.

**रिटा शाहः-**

साहेब, आपण परत हा विषय काढलेला आहे. आपण आता जे शिवार गार्डनचे बोलला. तेव्हा आपण आयुक्त होता व आपण मला उत्तर दिले ते प्रोसेडिंगवर आहे. मी त्याबददलचा विरोध केला नव्हता. आरक्षणाची बोर्ड लावायचा असा आपल्याकडे मा. महासभेत विषय होता व ठराव पास व्हायच्या अगोदर रात्रीच्या रात्री बोर्ड चोरुन कोणीतरी लावले. तुम्ही मला असे ही उत्तर दिले आहे की, मी नाव देउ शकत नाही. म्हणजे तुम्हाला नाव माहिती आहे. या मुददयावर साहेब मी बोलली होती. आज तुम्ही खरोखर जो अधिकारी असेल व आपण कोणाची बाजू घेत नसाल तर आपण ते नाव डिक्लेअर करा आणि जर तुम्हाला तुमच्या अधिका-याला वाचवायचे असेल तर वाचवा आणि आता जो चर्चेचा विषय आहे भूसंपादनाचा, त्याला माझी हरकत नाही व तुम्ही नाव देउ नका.

**आसिफ शेखः-**

एक कोटीची तरतुद आहे व त्यापैकी वीस लाख रुपये साईडला ठेवून आपण ऐंशी लाख आहेत. ते आपण इतर कामासाठी वर्ग करणार आहोत आणि त्या वीस लाखामध्ये बाजारासाठी आणि कत्तलखान्यासाठी एजन्सी नेमणार आहोत आणि बाकीचे जे आहेत ते एक-एक करुन आयटम व्हाईज घ्या.

**मिलन म्हात्रेः-**

सभापती साहेब, मागच्या स्थायी समितीला जी बैठक झाली. त्यावेळी आम्ही हयाच्याकरिता टाकले होते. मिरा रोडवरुन ज्या गाई पकडून आणतात अशा दहा गाई रेल्वे फाटकातून आणताना ॲक्सीडेंट झाले व रेल्वे बंद होती. हयाच्यामध्ये माझा प्रस्ताव असा होता की, मिरा रोडला जर आपण दोन कोंडवाडे बनवले तर तिथेच जनावरे ठेवता येईल व त्यासाठी आपण जागा ही उपलब्ध करु. पण साहेब, आपण हा निधी कुठेही वर्ग करु नका. कारण आपला जो कर्मचारी आहे, ठेकेदार आहे तो ती जनावरे हाकत हाकत येथपर्यंत येतो व त्या जनावरांना ती माणसे मारतात, एक्सीडेन्ट होते. याकरिता कोंडवाडयाचा जो प्रस्ताव आहे. त्याची आपण सिरियेसनेस बघा की, ते का आहे. पटकन आपण हयाच्यावर निर्णय घेउ नका आणि आपण शेवटचा विषय घेतला आहे. प्रभाग समिती नेमणे हयाचा विषय उदयाच्या मा.महासभेच्या विषयपत्रिकेवर आहे. उदया जर हयाला मा. महासभा मंजूरी देते तर हे पैसे तुम्ही लॅप्स करणार. म्हणून हयाच्यातील तरतुद आहे ती तशीच ठेवा.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

तुमचे मत बरोबर आहे. परंतु, प्रश्न असा निर्माण झालेला आहे की, प्रभाग समित्या जिथे कार्यालय बांधायचे आहे. त्या ठिकाणी नगरपालिकेच्या ताब्यात जागा नाही आणि असलेल्या इमारतीमध्ये फर्निचर आणि ऑफिस करायचे आहे. त्यामुळे पन्नास लाख पुरेसे आहे असे बांधकाम खात्याचे म्हणणे आहे.

**मिलन म्हात्रेः-**

मग, तुम्ही असे करा ७५ लाख आम्ही आमच्याकडे ठेवतो बाकी तुम्ही घ्या.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

मार्च पूर्वी खर्च होणार नाही.

**मिलन म्हात्रेः-**

आता दोन प्रपोझल मी पाठविली तर आरोग्य खात्याने सरळ सांगितले की, तरतुद नाही.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

नगरभवनला दोन जागा आहे. तिथे कार्यालय बांधायचे आहे आणि फर्निचर करायचे आहे. नंतर खारीला, बंदरवाडी शाळेजवळ एक आहे. एक मिरा रोडच्या ऑफिसला आहे. तिथे इमारत ऑलरेडी आहे. फक्त फर्निचर, टेबल, खुर्च्या हयासाठी आपण पंचवीस लाख ठेवू आणि तुम्ही म्हणता ते बरोबर आहे. प्रभाग ऑफिस बांधल्याशिवाय बांधकामाचा खर्च आणि फर्निचरचा खर्च होणार नाही. मार्च पूर्वी हया तीन महिन्यात होणार नाही आणि आता असलेल्या इमारतीमध्ये फक्त दुरुस्ती आणि फर्निचर आहे.

**मिलन म्हात्रेः-**

माझ्या वॉर्डात सर्वे झाला व तिथे बालवाडया रेडी आहेत. फक्त पार्टीशन टाकून दवाखाने टाकायचे आहे. मला अधिकाऱ्यांनी रिपोर्ट केली की, तरतुद नाही. नाकाडी साहेब येथे बसले आहेत. मी त्यांच्या ऑफिसमध्ये जाउन त्यांना विचारले की, ही तरतुद उपलब्ध करुन दया आणि त्यांना सांगून तरतुद करायला लावली. तुम्ही हयाच्यात जास्त रक्कम ठेवा.

**(मा. कल्याण केळकर सो. यांनी प्रकरण ७ कलम (२)चे वाचन केले.)**

**शरद पाटीलः-**

सभापती साहेब, आता आपण जे पुर्ननियोजन करतोय. त्याच्यात खारीगाव ते आर.एन.पी.पार्क हा एक नाला समाविष्ट करावा. कारण पावसाळयाच्या अगोदर जर तो नाला झाला नाही तर भाईंदर पूर्व येथे संपूर्ण पाणी भरेल.

**अनंत पाटीलः-**

आरोग्याच्या दृष्टीने काही खाजगी जागेतून नाला वाहतो तो रिपेरींग करुन घ्या.

**धनराज अग्रवालः-**

सभापती साहेब, सन्मा. सदस्य शरद पाटील नाला सांगत आहेत. त्याचे कारण काय आहे? आता आपले जे हेडगेवार मार्ग चालू आहे. तर पहिले ते पाणी सर्व मिरा रोड खाडीवरुन जात होते.

आता त्याच्यात सहा का सात उघाडी डबल बांधले व पाणीचा प्रवाह दुस-या साईडला येणार आहे. येथे येणार आहे. मग नवघर, गोडदेव सगळे बुडेल. जर हा नाला मोठा केला नाही तर बुडणार आहे. म्हणून हा नाला केला पाहिजे.

**दिपक खांबीतः-**

साहेब, एस्टीमेट करुन घेउ.

**दिनेश नलावडेः-**

सभापती साहेब, आमच्या पण काही सुचना आहेत. जसे सदस्य शरद पाटीलसाहेब बोलले रस्त्याच्या बाबतीत तर जो एस.व्ही. रोड आहे व तो गणपती व इतर कामासाठी वन वे केलेला आहे. काल त्या एस.व्ही. रोडचे आम्ही उदघाटन केले. ए.पी.आय. बालसिंग साहेब, आम्ही सर्व तिथे होतो. सभापती साहेब, तो रोड एवढा खराब आहे व वाहतूक अतिशय जास्त आहे आणि प्रत्येक वर्षी तिथे पाणी तुंबते आणि तिथे अक्षरशः चिखल असतो. स्पॅच्युअलपण केला तरी व्यवस्थित होत नाही. मी या ठिकाणी सुचना करतोय की, तो नवीन रस्ता डांबरीकरणासाठी घ्यावा.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

नवीन कामे तुम्ही सभापती साहेबांना दया.

**दिनेश नलावडेः-**

सभापती साहेब, हा जो विषय आलेला १८२ हा विषय आपल्याकडे रिर्झव्ह फंड जो आहे. तो रिर्झव्ह फंड आपल्याकडे जागा उपलब्ध नसल्यामुळे आपण तो पुर्नविनियोजन घेतोय आणि ठराविक रक्कम ठेवून हा विषय मंजूर करावा अशी मी सूचना सभागृहाला करतोय.

**रिटा शाहः-**

अनुमोदन आहे. अनुमोदन करायच्या अगोदर माझी सुचना आहे.

**अनंत पाटीलः-**

उत्तन भाईंदर रस्त्यालगत शिवनेरीच्या समोर बरेचसे बांधकाम नव्याने होत आहे. तिकडचा येणारा जो पाण्याचा फ्लो आहे तो बंद होण्याची शक्यता आहे. त्या ठिकाणी आपण जर नाल्याची सोय केली तर तेवढाच पाण्याचा प्रश्न मिटून जाईल.

**मिलन म्हात्रेः-**

सभापती साहेब, अनुक्रमांक ३ मध्ये महापालिका विश्रामगृहाची पूर्ण तरतुद फिरवली तरी हरकत नाही आहे.

**धनराज अग्रवालः-**

आपण हे जे तीनमध्ये आणले आहे. मा.महापौर, मा.आयुक्त, मा.उपआयुक्त, मा. उपमहापौर, सभागृह नेते यांच्या दालनात नुतनीकरण. पण नुतनीकरण तर झालेले आहे.

**दिपक खांबीतः-**

नुतनीकरण केले पण अजून पैसे दिलेले नाही.

**मिलन म्हात्रेः-**

स्टेशनच्या गार्डनमध्ये खेळणी बसविण्याचा प्रस्ताव विथ ड्रॉईंग पाठवून तीन महिने झाले. पण त्याचा उल्लेख हयाच्यात नाही आहे.

**मा. सभापतीः-**

जी नवीन कामे असतील त्याची माझ्याकडे नोंदणी करावी.

**आसिफ शेखः-**

३५ लाख रुपये आहेत. त्यावेळी ९ लाख रुपये सार्वजनिक सुलभ शौचालय व मुतारी असे केले आहे. तर त्यामध्ये फायबरची मुतारी असे आहे व फायबरचे सुलभ शौचालय असेही त्यामध्ये टाकून घ्या.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

सुलभ शौचालय आम्ही खरेदी करत नाही. ते बंद केले आहे.

**शरद पाटीलः-**

सभापती साहेब, फायबरची जी मुतारी दिली आहे. त्याच्यात व्यवस्थित साफसफाई होत नाही.

**मिलन म्हात्रेः-**

नगरपालिकने सुलभ शौचालय बांधायचे मान्य केले आहे. ज्या सभेला नाईक साहेब गैरहजर होते. त्यामध्ये सभेमध्ये बोललो होतो. आपण ज्या संस्था नेमलेले आहेत. त्यांना किती रुपये मिळतात. त्या तोटयामध्ये आहेत. हा विषय या सभागृहामध्ये झाला आणि तुम्ही त्याच्यावर आदेश्

दिलेले आहेत व तुम्ही ते बांधकाम बघा व शौचालयाच्या रक्कम मंजूरीसाठी विषय आला होता. त्याच्यावर चर्चा झाली. आपल्याकडची जी शौचालय आहेत. तर नविन शौचालय बांधण्याच्या परमिशनसाठी विषय आला होता. तेव्हा मी त्यांना विचारले होते जर आपण हा विषय परमिशनला आणता आणि आपले सिव्हील इंजिनिअर सांगतात की, नगरपालिका संडास बनविणार नाही. एकीकडे नाहीचे उत्तर येते व एकीकडे मंजूरीचे उत्तर येते आणि ही मंजूरी घेते वेळेला पॉलिसी चेन्ज केलेली आहे आणि जर का नविन संडासचे प्रस्ताव आले तर ते बनवायचे असे त्यावेळेला झालेले आहे.

**मा. सभापती :-**

ठिक आहे. बनवून घेउ. नविन कामाचे प्रस्ताव माझ्याकडे आणून दयावे.

**रिटा शाह :-**

सभापती साहेब, आपण बोललात की, नविन काम असेल तर माझ्याकडे आणून दया. त्याबाबत पत्रव्यवहार मी केलेला आहे. मागच्या वर्षी त्याला ७५ लाखाची तरतुद केली होती. हे आपल्याला माहिती असेल, विनायक रोड ते जैन मंदिरपर्यंत जो नाला आहे. तो रिपेरिंग करुन त्याच्यावर नविन स्लॅप टाकून रहदारीसाठी रस्ता बनवून दयायचे असे आपल्याकडे पास झाले होते. तर तो रस्ता तातडीने बनवून घ्या. आपल्याला तो रस्ता फार उपयोगी पडणार आणि आपण तिथे बाजार तात्पुरते हलवू शकतो. तिथे स्ट्रीट लाईट बसवून लादया टाकून घ्या.

**मा. सभापती:-**

एस्टीमेट केले आहे. त्याला आपण मंजूरी देउ.

**रिटा शाह:-**

आणि दुसरे जे नारायण नगरचे गटार आहे. ते संपूर्ण तुटलेले आहे व तिथे सर्वेदेखील केला आहे. ते गटार तोडून परत बनवायचे त्याचा समावेश करुन घ्या.

**प्रकरण क्र.१८२:-**

पुर्नविनियोजन पत्रकांस मंजूरी मिळणेबाबत.

(सदरच्या ठरावाची प्रत सदर इतिवृत्तांतासोबत जोडली आहे.)

**(प्र.सचिवांनी प्रकरण क्र.१८३ चे वाचन केले.)**

**मोहन पाटील:-**

सभापती महोदय, मागच्या वेळेला हा विषय आला होता. त्यावेळेला आपल्याकडे जेवढी समाजमंदिर आहेत त्याची माहिती आपण मागवली होती. त्याची माहिती आली नाही. त्याची संपूर्ण माहिती घ्या आणि दोनदा हया संस्थेचा अर्ज आलेला आहे. मागणीचा तर दोनदा अर्ज आल्यामुळे आपण त्याचा निर्णयही हया ठिकाणी घ्या आणि त्या निर्णयाला बांधिलकी राहून संपूर्ण जे समाजमंदिर आहेत. खासदार फंडातून, आमदार फंडातून, महापालिका फंडातून जी समाजमंदिर बांधली आहेत. त्याची सध्याची स्थिती काय आहे? ते कोण कोण वापरत आहेत व त्यांना किती भाडे आकारायला पाहिजे. या सर्वांचा निर्णय तुम्ही घ्या. पण हया सर्वांचा निर्णय घेताना सध्या दोनदा प्रॉयरिटी बेसीसवर हयाचा विचार या सभेने करावा आणि बाकी संपूर्ण माहिती समाजमंदिराची मागवून त्याची काय स्थिती आहे ते बघून त्या त्या संस्थेला देण्याचे प्रोव्हिजन करावे. याचा विचार करावा.

**धनराज अग्रवाल:-**

माहिती मागितली होती. तर ती माहिती का देण्यात आली नाही.

**अनंत पाटील:-**

सभापती साहेब, मिरा रोड या ठिकाणी जी व्यायाम शाळा आमदार निधीतून बांधलेली आहे. ती जवळजवळ एक वर्षापासून तशीच पडून आहे. त्याचा कुठल्याही त-हेने उपयोग केला जात नाही आणि म्हणून कुठल्यातरी संस्थेने ती मागणी केली आहे. तर नाममात्र भाडयनें दयायला हरकत नाही. आपण एक रुपया भाडयाने अगोदर काही दिले आहे. जर त्या भाडे दरात वाढ करुन दयायला हरकत नसावी असे मला वाटते.

**धनराज अग्रवाल:-**

हयाची फी कोण ठरवणार?

**मिलन म्हात्रे:-**

सभापती साहेब, हया ज्या संस्था येतात. हयांना व्यायामशाळा चालवायला देण्यासाठी माझी हरकत नाही आहे. हे कमरशियल बेस आहे. तुमचे स्ट्रक्चर आहे. त्यांनी सामान आणले सर्व ठिक आहे. तुमची मालकी टिकली पाहिजे. त्यांना तुम्ही वर्षाला हजार रुपये भाडे लावा तर महिन्याला ऐंशी, नव्वद रुपयेदेखील पडत नाही. आपण एक रुपया लावायचे म्हणजे काय? हजार रुपये लावा.

**धनराज अग्रवालः-**

साहेब, हयाची फी कोण ठरवणार?

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सोा.) :-**

ए.डी.टी.पी. फी ठरवणार.

**मोहन पाटीलः-**

आता जी फी दिली आहे. ती कोणत्या हिशोबाने दिली आहे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सोा.) :-**

वार्षिक भाडे पस्तीस हजार.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सोा.) :-**

सगळे समाजमंदिर आणि व्यायामशाळा व त्या भागातले, शहरातले ज्या संस्था आहेत. मग महिला मंडळ असेल किंवा रजिस्टर संस्था असेल. त्या संस्थेकडून सर्व व्यायामशाळा आणि सर्व समाजमंदिरासाठी अर्ज मागवा आणि अर्ज आल्यानंतर कोणकोणत्या संस्थेला दयायचे कारण इंडीव्हयुजव्हल व्यक्तीला दिले तर काढून घेताना अडचणी निर्माण होतात. म्हणून संस्थेला दया व संस्था त्याचा उपभोग करतील आणि नगरपालिकेला त्याचे भाडे मिळेल आणि त्याचे मेन्टेनन्सदेखील होईल.

**शरद पाटीलः-**

सभापती महोदय, संस्थेला देण्याकरिता कोणाचा विरोध नाही आहे. पण देताना तुम्ही अटीशर्ती त्यांच्याकडून लिहून घ्या. त्याची डागडुजी, मेन्टेनन्स त्याने केला पाहिजे. उदया जर ते पडायला आले तर मी चाललो मला काही गरज पडलेली नाही. त्याचा जबाबदार नंतर कोण?

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सोा.) :-**

म्हणून संस्थेबरोबर ॲग्रीमेन्टमध्ये ते सर्व लिहून घ्यायचे.

**मिलन म्हात्रेः-**

आता ज्या व्यायामशाळा बंद आहेत व ज्यांनी आपल्याकडून भाडयावर घेतले ते ब्लँक झाले. त्यांना तुम्ही दिले आणि आता तो वापरत ही नाही. तशाच पडून आहेत.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सोा.) :-**

त्याकरिता सरळ टेंडर काढायचे की, हया भागात समाजमंदिर आहे. हया भागात व्यायामशाळा आहे व हे वापरण्यासाठी पेपरला देवून संस्थेचा अर्ज मागवून घ्यायचा व सगळया संस्थेचा अर्ज तुमच्यापुढे ठेवून कोणाला दयायचे ते मंजूर करून दयायचे आणि दुरुस्ती, मेन्टेनन्स, लाईट बिल त्याने भरायचे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सोा.) :-**

मी मागील सभागृहातसुध्दा हे सांगितले होते की, आपल्या मुंबई परिसरामध्ये विशेषतः ब-याच संस्था जीम चालविण्याकरिता इच्छुक आहेत. या धर्तीवर आम्ही प्रयोग केले आहेत. वसई येथे जाउन आपण बघा तिथे मामासाहेब मोहोळ क्रिडा मंडळ हयांनी एक स्वतःची संस्था स्थापित केली. ते आपल्याला माहिती असेल व तिथे मोठया प्रमाणात कला क्रिडा महोत्सव भरला जातो आणि त्यानंतर उरणला विजू पेणकर सुप्रसिध्द क्रिडापट्टू जो महाराष्ट्रातला आहे. त्याने स्वतः एक चांगल्याप्रकारची संस्था त्याला नगरपालिकने चांगली जागा दिली व तो स्वतः तिथे ती संस्था चालवतो आणि त्याचे आम्ही नियम करुन दिले की, त्यांनी विदयार्थ्यांकडून ठराविक रक्कम घ्यावी व त्यानुसार त्यातल्या उत्पन्नाचा ६० आणि ४० टक्के असे प्रमाण ठरवावे. या बेसीसवर आपण दिले तर त्या संस्था व्यवस्थितपणे चालू शकतील आणि त्या संस्थेची आर्थिक स्थिती लक्षात घेउनच त्या संस्थेला दयावे. नाहीतर भाडयावर घ्यायचे आणि काहीच करायचे नाही. ते तसचे पडून रहायचे हे बरोबर नाही.

**मिलन म्हात्रेः-**

सभापती साहेब, यापूर्वी नगरपालिकेच्या ज्या व्यायामशाळा होत्या. त्या काही लोकांना दिल्या गेल्या आहेत आणि त्या व्यायामशाळा आता पडीक स्वरुपामध्ये आहेत. त्याकरिता त्यावेळेला त्यांच्याकडून जी ॲग्रीमेन्ट बनविली होती. त्यानुसार त्या व्यायामशाळा कार्यरत ठेवणे त्या व्यक्तीचे, त्या संस्थेचे कर्तव्य होते. त्याचे ब्रीच ऑफ कंडीशनखाली ते ॲग्रीमेन्ट कॅन्सल करुन घ्या. नव्याने ती परत आपल्या ताब्यात घ्या आणि मग नाईक साहेब बोलले तसे नोटीसा काढून एकाच वेळेला सर्व त्या संस्था व व्यायामशाळा वगैरें संपूर्ण एकाच हयाच्यात घ्या. कारण एकाला एक न्याय आणि दुस-याला दुसरा न्याय असे नको.

**मा. सभापती:-**

हया विषयावर आता भाडे ठरवायचे आहे का की, एकत्र भाडे ठरवायचे आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

तुमच्यापुढे सगळे आल्यानंतर भाडे ठरवून घ्यावे.

**मोहन पाटील:-**

सभापती महोदय, आमचे म्हणणे असे आहे की, सध्या दोनदा अर्ज या ठिकाणी आलेला आहे व व्यायामशाळा चालवण्याचा जो मनोदय आहे आणि केळकर साहेब सिक्स्टी, फोर्टीप्रमाणे बोलले तर असे कोणताही बिझनेस परप्रोझ होईल असे कोणतेही काम करु नका. जर त्या ठिकाणी एखादी संस्था काम करत असेल चांगल्या पध्दतीने कारण विनामुल्य बरेच लोक व्यायामशाळा चालवतात. तर त्याला तुम्ही प्रपोशन धंदेवाईक लावले तर तो आणखीन पध्दतीने करेल. अटीशर्ती आपण ठेवा आणि हया संस्थेने जो अर्ज केला आहे. त्याचे भाडे तुम्ही या ठिकाणी निश्चित करा आणि सर्व संपूर्णपणे मागवा. नाहीतर तुम्ही हयांचे हया वर्षाकरिता करुन घ्या. हे जे चालू फायनान्शिअल वर्ष आहे. तोपर्यन्त तुम्ही त्यांना देउ या.

**मा. सभापती:-**

त्यांना भाडे व अटीशर्ती ठरवून दुसऱ्या वेळेला ठरवूया. आता देउ शकत नाही. हया एकाच विषयाला आपण कसे ठेवू शकतो. कारण आपण इतर संस्थांना पण बोलावतो.

**मोहन पाटील:-**

तुम्ही त्यांना आपल्या अटीशर्तीवर आर्थिक वर्षाकरिता दया.

**मा. सभापती:-**

अटीशर्ती काय माहिती नाही. कसे भाडे लावायचे, किती फुटावर लावायचे.

**रिटा शाह:-**

मग आपण सर्व एकत्रित करुन पुढच्या सभेत आणा.

**मोहन पाटील:-**

आपण खरेतर टिपणी सोबत गोषवा-यासोबत माहिती दयायला पाहिजे की, एवढे समाजमंदिर आपल्याकडे आहेत व एवढे समाजमंदिर हया संस्थेकडे आहेत.

**अनंत पाटील:-**

आपण पुढच्या सभेत विषय घ्या.

**आसिफ शेख:-**

सभापती साहेब, आता जो अर्ज आला आहे. त्याच्यावर निर्णय व्हायला पाहिजे.

**मा. सभापती :-**

मग तीन महिन्यासाठी दयायचे का?

**आसिफ शेख:-**

तीन महिन्यासाठी दया. आर्थिक वर्षाकरिता दयायला आमची हरकत नाही.

**मा.सभापती:-**

दुसऱ्या सभेत आपण हा विषय घेउ की, किती व्यायामशाळा आहेत, किती समाजमंदिर आहेत. हयाची सविस्तर माहिती मागू या.

**मोहन पाटील:-**

आपण जी पॉलिसी ठरवणार त्याच्यामध्ये जुन्या बॉडीने जी काही समाजमंदिर दिलेले आहे. त्याचा ही फेरविचार या ठिकाणी व्हायला पाहिजे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

जो मोबदला घेउन महापालिकेच्या मालकीची कोणतीही स्थावर मालमत्ता किंवा कोणताही हक्क विकता येईल. पटटयाने देता येईल किंवा अन्यथा हस्तांतरण करता येईल. तो मोबदला असे अधिमुल्य भाडे किंवा अन्य मोबदला यांच्या चालू बाजार किंमतीपेक्षा कमी असता कामा नये. म्हणजे पूर्वी एक रुपयाने दिलेले आहेत. त्यावेळेला नगरपालिका होती.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

त्याच्यापेक्षा कमी तुम्हाला देता येणार नाही.

**मोहन पाटील:-**

मागे जी दिली आहेत व आता महानगरपालिका झाली तर त्यांचे भाडे तुम्ही रिव्हाईस करणार का?

**दिपक खांबीतः-**

त्यांच्यासोबत अकरा वर्षाचे ॲग्रीमेन्ट आहे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

नगरपालिका अधिनियम १९६५ चे कलम ९२ नुसार यांनी आता सांगितले की, नगरपालिकेने दिलेल्या प्रॉपर्टी यांच्यामध्ये जर भाडयाने पुर्नमुल्यांकन करण्याची तरतुद हस्तांतर नियमामध्ये आहे नगरपालिकेच्या आणि पुर्नमुल्यांकन नगरपालिका करु शकते. करु शकत नाही अशातला भाग नाही.

**मोहन पाटीलः-**

त्यांना अकरा वर्ष दया. पण मुल्यांकन ते लावा.

**रिटा शाहः-**

साहेब, आता जो प्रकरण आणलेले आहे. तर खांबीत साहेबांना कळकळीची विनंती आहे की, मला असे वाटते ही हा मुदद‍ा आपण आज पारित करा व हयांनी जे मुल्यांकन दिलेले आहे ते बरोबर आहे का? आणि बरोबर आहे तर पारित करायला हरकत काय आहे?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

माझ्या माहितीप्रमाणे मी जे उरणला केलेले आहे. विजू पेणकर हयांनी जी व्यायामशाळा काढली त्याचे रेट नगरपालिकेने ठरवून दिले व नगरपालिकेने ताब्यात दिलेली आहे. मोठा हॉल ताब्यात दिला आणि त्याचे जे भाडे येते त्या भाडयाचे किंमत आम्ही सिक्स्टी, फोर्टी बेसीसवर ठेवलेली आहे. फोर्टी परसेन्ट नगरपालिकेला देतो आणि सिक्स्टी टक्के त्याचे अशी त्याच्यामध्ये तरतूद आहे. कारण त्याच्यामधले सर्व इन्स्टयुमेन्ट त्याने त्याच्या खर्चाने आणलेली आहे व आपण तिथे जाउन ते बघु शकता.

**दिनेश नलावडेः-**

साहेब, आपण अशाप्रकारचा विषय सभागृहाकडे दया. आम्ही त्याला मान्यता देउ. नाहीतर असे होणार आपण आज एखादया मंडळाला देणार आणि ते मंडळ आपल्या मनमानीप्रमाणे चालेल.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

हयामध्ये बेसीक असे आहे की, एकाचा समाजमंदिरासाठी अर्ज आला आणि आम्ही दिले असा त्याचा अर्थ होईल. कारण पेपरला एखादी जाहिरात आल्याशिवाय न देता ते दिले तर ते कायदयाला अनुरुप होणार नाही. मग आम्हाला का विचारले नाही. आम्ही अर्ज केले असता असा प्रश्न निर्माण होईल. त्यामुळे पेपरला एखादी जाहिरात देउन सगळयांचे अर्ज मागवून घेउन मग आपला जो रेट लावायचा आहे. तो लावून आपण जर मंजूर केले तर बरे होईल.

**रिटा शाहः-**

साहेब, हे पॉलिसी मॅटर आहे. हयाच्यावर तुम्ही पॉलिसी ठरवा आणि ती पॉलिसी सभेसमोर आणा.

**दिनेश नलावडेः-**

सभापती साहेब, उपआयुक्त साहेब हे विषय जे आहेत. ते आपण नेहमी प्रॅायोरीटी असे सभागृह करतो व प्रत्येक खात्याला आम्ही विचारत असतो. आपले महत्वाचे विषय कोणते आहेत. आपण ते आमच्यासमोर ठेवा. तर ते आमच्याकडे विषय नाही. तर वर्षानुवर्ष असेच चालणार आहे. आता आपण प्रायोरीटी देतो जे रिझर्वेशन प्लॉटचे आहे तो पण तुम्ही विषय आणल्यावर सभागृह त्याला मंजूरी देणार आहे.

**शिवमूर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

पुढच्या सभेत विषयपत्रिकेवर हे दोन्ही विषय येणार आहे.

**अनंत पाटील :-**

या संस्थेच्या व्यतिरिक्त वर्षभरात दुस-या संस्थेचा अर्ज आला आहे का? म्हणजे ज्यांना खरोखर आवश्यकता आहे व ते तुम्हाला सांगतात आम्ही त्यांची सेवा करू शकतो.

**मा. सभापती :-**

दुस-या संस्थेचा अर्ज आलेला नाही.

**अनंत पाटील :-**

ज्या संस्थेचा अर्ज आलेला नाही त्याचाच आपण मग विचार करा. जर आणखीन दोन तीन अर्ज असते तर आम्ही सांगितले असते त्यांचा विचार करावा.

**मा. सभापती :-**

पण आता ठरविले की पुढच्या सभेत विषय घेउ या.

**अनंत पाटील :-**

मग ह्यांना तुम्ही तीन महिन्यासाठी देउन टाका. व तुम्हाला नंतर पुर्नविनियोजन करायचे असेल तर तेव्हा पेपरात डिक्लरेशन करा व नोटीफिकेशन काढा.

**मा. सभापती :-**

ती संस्था तीन महिन्यांसाठी तयार आहे व पाठीमागचे जे मूल्यांकन आहे त्याचा पुर्नविचार या ठिकाणी करायचा आहे. पुर्वी नगरपालिकेच्या वेळेला जे समाजमंदिर दिले आहे त्याचे भाडे कमी आहे व त्याचे पुर्नमुल्यांकन करता येते तेव्हा तुम्ही सन २००३-०४ मध्ये करू. तेव्हा तुम्ही सर्व समाजमंदिराची माहिती मागवून घ्या. आणि आता जे भाड्याने द्यायचे आहे त्याचे भाडे तुम्ही ठरवा.

**शरद पाटील :-**

मा. माजी सभापती महोदय, हा विषय त्यावेळेला आपल्यावेळी देखील आला होता. तेव्हा आपणच सांगितले होते सर्व सविस्तर माहिती घेउन या. आणि आज तुम्ही त्या विषयाला एकटयाला म्हणून करायला सांगता.

**मोहन पाटील :-**

जर सभागृहाची मान्यता असेल तर ते तीन महिन्याकरिता तयार आहेत.

**शरद पाटील :-**

हे देण्यासाठी कोणाचाही विरोध नाही. पण हा जो नियम वाचून दाखविला त्या नियमाला आपण बांधिल राहू का?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

बाजार मुल्यांकनने ते घ्यायला तयार आहेत का?

**आसिफ शेख :-**

उपआयुक्त कल्याण केळकर साहेब त्यांनी आता मुद्दा उपस्थित केला की, बाजार मुल्याला घेण्यास जर तयार असतील तर मला वाटते देण्यास हरकत नाही. या अर्जावर विचार व्हावा.

**अनंत पाटील :-**

राईला सुद्धा अशा तऱ्हेची व्यायामशाळा होती. फक्त नाममात्र एक रुपया भाड्याने दिलेली आहे.

**प्रकरण क्र.१८३ :-**

मिरा रोड व्यायामशाळेची इमारत भाडेतत्वावर देणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

**ठराव क्र. १६३ :-**

मा. सभापती सो. यांच्या आदेशानुसार व्यायामशाळा व समाजमंदीराची सविस्तर माहिती घेऊन सदरचा विषय पुढील सभेत घेण्यांचे ठरविले.

**(प्र. सचिवांनी प्रकरण १८४ चे वाचन केले.)**

**प्रकरण क्र. १८४ :-**

मा. सदस्य स्थायी समिती यांच्या पत्रावर विचार विनिमय करून निर्णय घेणे.

**ठराव क्र. १६४ :-**

सदरचा विषय मा. सभापती साहेब यांच्या आदेशानुसार पुढील सभेत घेण्याचे ठरविले.

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे आभार मानून आजची सभा संपल्याचे जाहिर करत आहे.

**सभा संपल्याची वेळ : दुपारी १.३५ वा.**

**सभापती**
**स्थायी समिती,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगर सचिव,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**